
दुहरा वहरी चौथो अंक

'नाताळ' २५ डिसेंबर २०१३

# कादोडी



*Merry Christmas & Happy New Year*

MP

# Manual Print

## ALL TYPES OF NOTE BOOKS, QUESTION & ANSWER PAPERS

- SMARNIKA, ANNUAL REPORT PRINTING
- LAMINATION & CARTON PUNCHING
- ALL TYPE OF PLAIN & PRINTED SCHOOL STATIONERY, ANSWER PAPER,
- NOTEBOOKS & SCHOOL DAIRY

**Printing Machine Size**
**19" × 25" Four Colour**
**20" × 30" Single Colour**
**18" × 28" Single Colour**
**30" Lamination /**
**Automatic perfect binding machine**
**Automatic paper folding machine 23 × 36**

**Manual D. Dias**
**Mob.: 9765874493 / 9096753401**

Unit No.:4, Pailot Ind. Estate, Near Neminath Ind.
Navghar,Vasai Road ( East), Pin : 401 210

# कादोडी

## नाताळश्या हनाव विशेषांक

**२५ डिसेंबर २०१३**

दुहरा वहरी चौथो अंक

**एकून सातवॉ अंक**

खाजगी वितरन

**अंकायॅ पैशॅ**
**दा रुपय**

**या अंकात .......**


संपादकीय
आठोन - फा. आसिस रॉड्रिग्ज
वाट्निऑ लाडू - नेल्सन डिमेलो
शिल्पर - सुनील डिमेलो
मद्रास तॅ मुंबय विमान परवास - सायमन रॉड्रिग्ज
कविता - राजन डिमेलो / सेविन तुस्कानो / राकेश परेरा / वॉल्टर तुस्कानो
हॅगाट - बेर्नादेत रुमाव
वरमाय भरलीस गेली - मृणाल विजय मचाडो
मा खास मयतरनिया लगीन - डॅनियल मस्करणीस
हांबाsss !!! - एडवर्ड डिसोझा
“जागते रहो..... आमशा भरॉशॉर मत सोवो” - सचिन मेंडीस
कुपारी हन - जयेश डिकोष्टा
डाबऱ्यांई शान, वसयसॉ मान.... - नितिन डाबरे
कोंबडी पळाली - सिरील मिनेजिस
आन येशू ख्रिस्त परत जन्मा आलॉ - ख्रिस्तोफर रिबेलो


**संपर्क / अभिप्राय :-** आमश्या हरी संपर्क कऱ्याकरतान किंवा आपलॉ या अंकाविषयी अभिप्राय, तुमाला का आवडला, का नाय ता आमाला जरूर कळवा. बाजूला दिलेल्या ई-मेल आयडीवर ई-मेल करा किंवा संपादक मंडळाश्या कुनालाही फोन करा.


### संपादक

**ख्रिस्तोफर रिबेलो** (९८१९४३६०७८)

### संपादक मंडळ

**सायमन रॉड्रिग्ज** - ९९२०६२३५७५
**सुनील डिमेलो** -९७६७०१५२९७
**एडवर्ड डिसोझा** - ९००४०३७९५०
**डॅनियल मस्करणीस** - ९१५८९८६०२२
**राजन डिमेलो** - ८९८३४०९९८५
**जेम्सन डिमेलो** - ९८७०१४८३३९
**रॉबर्ट फर्नांडिस** - ९२२३५९५८३६
**रॉबिन्सन डिमेलो** – ९०११२२६२६९
**वॉल्टर तुस्कानो** - ९७३०२७०३०२

**मुखपृष्ठ :-** पॉल डिमेलो, गास

**Email :-** kadodivasai@gmail.com

**Web :-** www.onevasai.com

**मुद्रक :-** मॅन्युएल प्रिंट, वसई पूर्व - ९७६५८७४४९३


**सूचना:-** ‘कादोडी’ या अंकाव आठवॉ अंक ईस्टरश्या हनादिहा, २० एप्रिलला प्रकाशित होनार. या अंकात तुमाला लेख, कविता आहा कय साहित्य द्यासा हायदॅ ते १५ मार्चपोत **kadodivasai@gmail.com** मेल करा किंवा संपादक मंडळाला संपर्क करा.

जकलॅ जाहिरातदार, देनगीदार तहॅस चांगल्यो सूचना-अभिप्राय देनाऱ्या जकल्या कुपारी लॉकांअॅ आमॅ खूप आभारी हाव.
**नाताळसॉ हन जकल्या वाचकांना खुब आनंदाव आन मजॅऑ जाओ अहयो शुभेच्छा.**

**या अंकात प्रसिद्ध झालेल्या मताशी संपादक मंडळ सहमत हायदॅस आहा नाय.**

संपादकीय

## माव **नाताळसॉ** हन

मंडळी, आमॅ माकून तुमश्या दरी आपलॉस “कादोडी” अंक घॅवॉन आल्याव. सगळ्यात पयल्यो आपल्या जकल्यांना नाताळश्या हनायो ओबड्यो ओबड्यो शुभेच्छा. नाताळसॉ हन मंजॅ आपलॉ एकटॉशॅ एकटॉ हौशे-मौजेऑ हन. डिसेंबर मयनॉ उंगावलॉ, देवळातनॅ आगमन काळ सुरू झाल्यायी मॅनवात पेटली गा आपली हनाई तयारी सुरू हॉतॅ, वातावरनात थंडी आपली फुक माऱ्या सुरुवात करतॅ आन त्याई झुळूक आपल्याला पागुनात खिऱ्यादो ऊतळी कऱ्या लावितॅ. आपल्यो चित्तवृती कह्यो एकदम उल्हासत्यात. मनाला एक चैतन्य येतॅ, मन हौशी होवातॅ.

माला माऑ लानपनाऑ दी आठवात्यात, नाताळसॉ हन जवळ आलॉ गा आख्खॉ गाव तयारीला लाग्यासॉ. मयनॉभर आदीपासून मिटिंग घॅवॉन गोठयाव दॅखावॉ तयार कहॉ कऱ्यासॉ, खेळ कहॅ घ्याशॅ याई जकली वार्ता केली जाशी. मंग कामे वाटप.. आठ-दा दी आदी मंग गॉठयाई आखनी-बांधनीला सुरवात होव्याशी, माला आठवाते, जेजूबाळाआ खाला गवताई सादर आथऱ्या आमॅ आमश्या हिवारातनॅ दवनॉ हाडतोतॅ, त्यात मग आमा पोराटाई शर्यत लाग्याशी, यॅळॉ, कोयती, गोन्टे ई सगळा मग सॉताआ घरनॅ घॅवॉन जासा, गावश्या म्होरक्या मंडळीला मॅ खुब काम कॅला आहा दावडॉन खुश कऱ्यासा आहातोता भगून.

आतॅ ई सगळा आपुन भाहाल्याव, आतॅ पोरे सॉताहून हॉडॉन द्या पन बोलविले तरी येत नाय, आपुन बी आपल्या सॉताला कित्ताल घालॉन घॅतलॅ, आपुन फक्त आपल्या सॉता आंगळ्यापोतुस रेल्याव, आपल्या घरसॉ जालॉ ना, गावसॉ गॉठॉ तरून मंडळी करदॅ. पन पयला मार्गदर्शन कऱ्या भोटॅ माहनेपन गॉठयामॅरॅ जम्याशॅ आपली एक जबाबदारी भगून.

बी माला या नाताळश्या हनानिमित्तानॅ पर्यावरनादृष्टीनॅ दोन गोष्टी हांग्याश्यो हात. आपल्या अडे कैक गावाई कापडी पिवश्यो बनवॉन वाटील्यो, आपुन आतॅ ठरविला आन आपल्या प्रत्येक गावानॅ ई मोहीम हाता घेतली, तॅ खुबश्यो प्लॅस्टिक पिवश्यो आपुन वासवू शकात्याव, त्यासबरोबर गॉहाळीश्या पोराई जा सेफ्टी टॅंकला जाळयो लाव्यासा काम घॅतलॅ, परत्येक गावात जर आहा कॅला तॅ नककीस डेंग्यू, मलेरिया हारक्या रोगांना आपुन लांब ठवू शकात्याव, बी एक साधॉ आन तात्पुरतॉ उपाय मंजॅ आपल्या टू-व्हीलरसा काढलेला खराब झालेला जुना ऑइल जरी सेफ्टी टॅंक मीनॅ टाकीला, तरी खुब मच्छर कमी होवू शकातॅ. सला तर मग या वॅळॅला हनानिमतान कय तरी वॅगळा करॉ या.. मग आपलॉ नाताळसॉ हन कॉडॉ मस्त हॉवेदे..

परत एकदा नाताळश्या हनायो जकल्यांना शुभेच्छा...

---

## आठोन

**- फा. आसिस रॉड्रिग्ज, येशूसंघीय, शिरपूर**

‘आठोन’ ऑ शब्द बोयल्योरूस खुपशे जन विसारत्यात... आठोन कॅई आन कुनाई..? खूपदा आपुन आठोन काढत्याव ती आपल्या जीवनात, आयुष्यात महत्वाई भूमिका बजाविलेल्या लॉकाई आन त्याहरी घडलॅल्या गोष्टीई.

नाताळसॉ हन ऑ जेजू बाळाला आठव्यासॉ हन. नाताळशा काळात आपल्याला याद येतॅ ती करजी, शंकरपोळयो, बिस्किटे आन कपड्याई खरेदी याई. काईक जन आपल्या जुन्या दॉस्तांना आठोनीनॅ घारा जिव्यादो यासा वारना करत्यात नातॅ फोन करॉन नुसत्यो शुभेच्छा देत्यात. आजशा तंत्रज्ञानानॅ पुडारलॅल्या काळात लोक आठोनीनॅ आपल्या जवळशा माहनांना, मित्रांना ईमेलवर हनायो शुभेच्छा धाडत्यात भगून इनबॉक्स आन फेसबुकसा पान एकदम भरॉन जातॅ. तहॉस ऑ नाताळसॉ हन मीनजॅ आपल्या आवडत्या माहनाला आठोनीनॅ कयतरी भॅट द्यासॉ हन.

देऊळशॅ फादर आपलॉ शरमाव कहॉ बऱ्यातबरॉ आन प्रभावी करता येदॅ जेनॅ तॉ लॉका कहॉ आठोनीत रॅदॅ भगून व्यस्त... तॅ गायन मंडळ गान्या सुरवातीत गुंग. या जकल्या गडबड घॉटाळ्यात आन आठोनीआ खॅळात माला प्रश्न पडातॅ की, “आपल्याला येशू ख्रिस्ताई आठोन हाय गा..?”

एक गोष्ट आठवातॅ.... अॅका पैशॅवाल्या जॉड्प्याला खुब वहरोर पॉर जाला. त्या घराला वंशज मिळालॉ. ऑ आनंद साजरॉ करॅ करता त्याई पॉरा पयल्या वाडदीहाला अॅका हॉल मिंनॅ बॉठ्ठॉ प्रोग्राम कॅलॉ. तॅ थंडीऑ दी हॉतॅ. प्रोग्रामला बरास लोक बोलविलता. एकेक करीत जहे लोक येतोते तहेस ते नाशादो जातोते... दोन-शार उडयो मारल्यो गा घामाघुम... भगून जे नाश्यादो लागलोते त्याई आपले कोट आन स्वेटर काडॉन जवळशा सोप्योर ठोयलॅ... बगीता बगीता तडे कोट आन स्वेटरशी राहास पडली.... या म्युझिक आन आवाजा गॉदाळात ता बारका बर्थडे बॉय गरुल्यो करीत घराईत सोप्योर स्वेटरशा मिनॅ ऊब मिळातोती भगून घुसला. जहे पावने वाडातोते तहे अॅकामॅकावर स्वेटर पडातोते. हळूहळू ता पॉर त्या स्वेटरशा राही

खाला डाखला गॅला. त्याव जीव गुदमऱ्या लागलॉ. ता पॉर जॉरात रड्या लागला पन म्युझिकशा गॉगाटात आन सॉता आनंदात त्या पॉरा रडन्याव आवाज कूना कानापा पॉसलॉ नाय. जकले गुतलोते नासन्यात, खान्यापॅन्यात.

पॉर रडला रडला आन गुदमरॉन बेशुद्ध जाला. मंग कुनाला तरी पॉराई आठोन आली आन शॉदाशोद सालू जाली शेवटी पॉर बेशुद्ध अवस्थेत स्वेटरशा राहित हापडला. ज्या प्रोग्रामशी सुरवात आनंदानॅ जालती त्याव शेवट मात्र... न भाहनाऱ्या दुखानॅ जालतॉ. वाडदीहाशा प्रोग्राममिनॅ मौजमजा करताना वाडदी साजरॉ करनाऱ्या पॉराला जकले बाहॉन गेले... कुनालास त्याई आठोन आली नाय...

या नाताळशा उल्लासा, उत्साहा हना दिहा ई दुख भरलेली कानी तुमाला खपॅशी नाय... पन माऑ अहॉ प्रश्न हाय की, "नाताळसॉ हन भगून आमे ज्याव वाडदी साजरॉ करत्याव त्याई आठोन आमाला हाय गा...?"

'नाताळसॉ हन ऑ - "दॅवा आठोनीत आपुन हात याई आठोन करॉन दॅनारॉ हन"

दॅवानॅ आपल्या जकल्या प्रेमापोटी, दयेपोटी आपला दुख जानॉन आपली पापातनॅ हुटका कऱ्या करता आपलॉ ॲकटॉशॅ ॲकटॉ पॉर या जगात धाडलॉ याई आठोन करॉन दॅनारॉ ऑ हन.

नाताळसॉ हन आमाला येशू ऑ सामान्य माहनात आन घटनात दर्शन दॅनारॉ आमसॉ देव हाय याई जान देतॅ. आन जे त्याऑ स्वीकार करॉन आपल्या रॉजशा घाई गडबडीआ जीवनात पन आठोन करत्यात त्यांना नक्कीस दर्शन देतॅ.

---

## वाट्निऑ लाडू — नेल्सन डिमेलो, दोनतलाव

गॅल्या आठवड्यात आमशा घारा हनपाळन्याव लाडू आलॉ. बो भारीस लाडू बांदिलतॅ. बॅताम ड्रायफ्रुट आन बो भारीस सव. मॅ मा पोऱ्यांना हांगीला लाडू खा ना, तॅ माई बोठी हांगातॅ, "जाम ड्रायफ्रुट हाय मॅ नाय खा तॉ लाडू. तॅ लानी हांगातॅ "डॅडी, ड्रायफ्रुट काड आन माला नुस्त्यो लाडायो कळ्यो दे". मॅ विसार कॅलॉ, का जालॅ हायदॅ आजकालशा पॉरांना? खादो हॉना दिला तरी तोंडे नाहित्यात ते. माला मा लानपनाॲ दी आठवालॅ. मंग मॅ दोगी मा मॅरॅ भेविल्यो आन ३०-३२ वहरा आदिशी एक कानी त्यांना हांगिली... मॅ जेमतेम ८-१० वहराव हायनॅ, आमशा पिपरीआ बाठात मॅ काकडॉ खुड्या गॅल्तॉ. काकडॉ खूडॉन घारा जा निंगालॉ तव आमशा आलेसकाकानॅ मिंगरनॅ हाक मारली आन एक कळ्याव लाडू मा हाथा दीलॉ आन हांगीला, "माई ऑबाय हनपाळन्याई आली, ऑडॉ लाडू आपल्या गावशा बाबुकाका घारा दे. आन आहा पन हांगीला की "तुमशी वाटनी तुमशा घारा धाडले रे". कारन तॅला माओर भरवासॉ नॉतॉ की ऑ लाडू बाबुकाकापोत पॉशॅदॅ गा नाय. मॅ तॉ लाडू घॅटलॉ आन मुक्काय निंगालॉ. दी मावळात आल्तॉ. भूक जाम लागले आन तॅ लाडू हाथात हात. मा घरशा वाट्निआ लाडाई एक कळी पान माला बग्या मीळॅशी नाय ई माला माईत हॉता कारन माय दोन लानॅ बंदव घारास हॉतॅ. तॅ कुहनीही वाटनी आल्या-बिल्याय पुरावॉ मिटविन्यात जाम हुशार... पान ऑ लाडू खासॉ कॉहॉ.? माला लागलोती जाम भूक. मॅ हळूहळू लाडू सुम्ब्यादो सुरवात केली. सगळ्या मॅरनॅ सूंबॉन सूंबॉन जरा बारकॉ कॅलॉ. काकडॉ खूडॉन हात निपलॅ अहल्यामुळे लाडाई ओळख लाग्याशि रेली. मंग मॅ लाडू पककॉ सूंबॉन जरा आटविलॉ आन तॉडात जा ऑडॉ कॅलॉ. मंग तॉडात या गालुटातनॅ त्या गालूटात जाम लोळविलॉ. लाडूला परत जरा सॉबा आली. पांढरॉ गुळगुळीत गॉटॉ कॅलॉ गा आन बाबुकाका हाता दीलॉ. हांगीला "आलेसकाका घरशी लाडूई वाट्नि. लाडूई हालत बगॉन आन मॅ तॉड सुंबीत हॉतॉ ई बगॉन बाबुकाका बोयलॉ, "पॉरा ऑ लाडू तुस खाय". ई आयकिता खोटी माला जालॅ शार पाय.... आन मॅ तॉ लाडू तॉहॉस सुंबीत सुंबीत खालॉ. कारन ती मजा कय वायलीस होती. ई माई कानी आयकॉन मा पोऱ्याई शी-थू कॅला आन उठॉन गेल्यो पान मा डॉळ्यात पानी आलॉ.... का तॅ दी हॉतॅ आन का आतॅ दी आल्यात....

## दुझू — नेल्सन डिमेलो, दोनतलाव

दुझूआ लगीन जाला. दॉगा नवरा बायकूआ एकमेकोर जाम प्रेम. एक दी दुझूआ बायकूनॅ दुझुला लाडात विसारला, " समजा उद्या मा कय बरा-वाईट जाला तॅ तुमे का करद्या ? (बायको यॉ प्रश्न आपल्या नवऱ्याला कतॅ ना कतॅ विसारत्यातुस) दुझुला या प्रश्ना उत्तर नक्की का द्यासा ता कय सुसात नॉता. दुझूनॅ बॅताम विसार कॅलॉ कॅलॉ आन तॉस प्रश्न बायकूला विसारलॉ, " मा कय बरा-वाईट जाला तॅ तु का करदा ? तॅ त्याई बायकू बोयली "ताहा कय जाला पा नाय.. पन समजा मा नशिबी ताहा कय आलास तॅ दुहरा लगीन करॅशी नाय. मॅ माई एक अठवरी काकबेन हाय ती हरी रॅनॅ." मंग दुझूआ बायकूनॅ परत दुझुला विसारला, आतॅ तूमॅ हांगा. तुमे का करद्या मॅ मेली तॅ? दुझू बोयलॉ, " मॅ पन आज तुई हप्पथ घॅऑन हांगातॅ, मॅ दुहरा लगीन-बिगीन करॅसॉ नाय. मॅ पन तुई अठ्वरी काकबेन हाय ना तीस हरी रॅनॅ.

तुम्ही मागे ठेवलेल्या सर्व चांगल्या संचीतामुळे आम्ही आज कृतार्थ आयुष्य जगतोय.

स्व. बावतीस लुद्रिक


स्व. झुज्या बावतीस लुद्रिक

स्व. फ्रान्सिस झुज्या लुद्रिक

देणार

मर्शीबाई फ्रान्सिस लुद्रिक

“कृतार्थ” कुटुंबिय



स्व. आलेक्स (नाना) लॉरेन्स दिब्रीत

13 मार्च १९३१ - ०७ ऑगस्ट २०१३

देणार

राजा लुद्रिक

परसाव

# शिल्पर

- सुनील डिमेलो, वटार - बारोडी

काहा का हाय मंडळी ! ओळखीला गा माला ? मॅ शिल्पर. आज-काल माला बाथरूम मीनॅ जा करता वापरत्यात. पन मंडळी मॅ पयल्यापासून ऑहॉ नॉतॉ. एकेकाळी मायी शान कय वायलीस होती. तुमशा पैकी २००० सालानंतर जे शिल्पर घाल्या हिकले त्यांना मॅ पूडॅ का हांगनार हाय ता पट्नार नाय पन माय जॅ जूनॅ चाहतॅ हात त्यांना ई नक्कीस पटॅदॅ. तॅ मंडळी तुमशा तीन-शार पीडयो अगोदरशा कुपाऱ्या पाया लाग्यासा भाग्य कय माला मिळाला नाय. पन १९४५-५० नंतरश्यो जक्ल्यो पीडयो मा आंगा-खांदयोर खेळल्यात, हा शब्दशा आंगा-खांदयोर.

मंडळी तिगाळा माव रुबाब कय वायलॉस हॉतॉ. कून कडॅ पन जाओ मॅ त्यांना हरबर पायूस. पावन्या घारा जादो, देवळा जादो, दुकानोर जादो, भाटात जादो, शाळीत जादो, कॉलेजला जादो, ऑडास नाय तर कामोर जादो पन मॅ साथ दिले. पाहाळयात आंगोर शिक्कल उडलॉ पा नाय भगून मा खांद्याला लबराये पट्टे लाऑन काम भागविला जासा. कतॅ-कतॅ शिकलातनॅ सलताना माव एखाद खांदॉ निखळ्यासॉ मंग पटकान कुडी बीडी घॅऑन नायतॅ नुसत्या हाथाय तॉ नीट कॅलॉ जासॉ. माहांगडॅ दिखनारॅ बिये माय बंदव घरात नातॅ मॅरॅ दॅरॅ अहले गा मंग मा कपाळोर पात (ब्लेड) घॅऑन तिरकोनी खून केली जाशी. नातॅ बॉड्या डॉख्याव टेकस टोपिलॉ जासॉ. कून कून त्यानशा नावा पयला अक्षर पन लिव्याशे, इंग्लिश मीनॅ. कून कून माव पिवळ्या रंगाव जाडॉ माहाबा पन हाडॅशे. आन तॉ एकदा घारा आलॉ गा मंग ३-४ वहरे कडेस जासॉ नाय. ऑडॉ टिकाऊ. कून कतॅ गॉया गेले तॅ तड्ने माई माहाबेन पायल घॅऑन याशे. पायल सॉ एक तरास मीनजॅ ती उजवी बाजू कुहनी आन डावी बाजू कुहनी ता पटकान कळॅसास नाय.

मंडळी, तिगाळा माला घरात कून वापऱ्यासा नाय, फक्त घाराबायार माव वावर अहॅसॉ. आख्खॉ दी नींबरामिनॅ दुनिया फीरॉन आले गा हांशापारा डेवनीओर नातॅ दारा खॉपात माला ठोयला जासा. कडे पय-पावन्या घारा जासा अहला गा पिवळी सर्फ पावडर आन हुंबाई गुंडी घॅऑन बरे ५-१० मिंटे खरखरॅ घऑन मा आंग धोयला जासा. मंडळी आजकाल पेनाई रीफील खपली गा नवी रीफील कून घॅ नाय तॅ नवॉ पेनुस घॅत्यात. ताहास चपलाये पट्टॅ तुटलॅ गा कून नवॅ पट्टॅ हाडी नाय डायरेक नवॅ शिल्परूस हाडत्यात. पन पयला आहा नॉता. माव ॲखादॉ खांदॉ तूटलॉ तॅ त्या पयला अपरिशान करॉन जॉडॅसॉ प्रयत्न कॅलॉ जासॉ. त्याय पन कय वॅळा वळली नाय तॅ मंग त्या जागी नवॉ पट्टॉ लावीलॉ जासॉ. मंग मॅ पुना नव्या जॉमान कामाला तयार. मा वरसॉ पांडॉ रंग जाऑन आतमिनसॉ नीळॉ रंग दिख्यापोत आन खळूई बाजू सापसुप घऑन तूट्या पोत माला वापरला जासा. कतॅ-कतॅ कुत्रे आमशा जोडीतशा ॲकाला पळवॉन न्याशे, गा जॉ रॅलॅलॉ हाय त्या लगीन बी कून आहास रॅलॅला हायदॅ त्याहरी लाविला जासा. आन मंग ते अम्मद - मम्मद भगून आयुष्यभर जग्याशे. आन समजा पाट लाव्या ऑहॉ कून मिळाल नाय तॅ मंग मायी बदली पोपयशा झाडोर हॉयाशी.

मंडळी, काळ बदललॉ. लॉकांदरी पैसॉ आलॉ आन तर-तऱ्याय वानो आल्यो. पयल्यान्शा काळात लॉकांदरी एकुस वान अहयाशि आन जकल्या ठिकानी जादो त्याईस सोबत अहयाशि. आतॅ घरातशो वानो, कामोर जाशे बुट, हुककुरवारॅ जीन्सवर घाल्या स्पोर्ट्स शूज, कतॅ कतॅ ट्रेकिंगला जादो रग्ड लुकवालॅ मजबूत शूज, गावात फिऱ्या-नाक्योर जादो-पावन्या घारा जादो सॅन्डल, वॉकिंग नातॅ जिमला जादो वॅगळॅ शूज आन बाथरुमला जादो मॅ ! कदो ? तॅ घरात वापऱ्याशॅ वेल्वेटशॅ चप्पल ऑलॅ हॉयद्यात भगून. तडे पन आतॅ आमशा मूळोर उठलॅलॅ प्लाश्टिकशॅ परप्रांतीय आल्यात.

कुनाला डोख्योर सडव्यासा, कुनाला उतारा बार ठोयासा ऑ ज्या त्याव प्रश्न हाय. पन मा ऑडास हांगना हाय की माला तुमे बाहॉ नाका. माला कुन नुसता बाथरूमला जादो न वापरता बायार जादो पन वापरतॅ हायदॅ तॅ तुमे त्याला हावॉ नाका. जाता जाता अमिताभ बच्चनसॉ एक डायलॉग आठवालॉ तॉ हांगातॅ, “साला, आदमी कितना भी बडा हो जाए उसको अपना औकात नही भुलना चाहीए”. मॅ जिगाळा वैभवा शिखर बगीला तिगाळा पन औकात बाहालॉ नॉतॉ आन आतॅ पन औकात मीनॅस हाय... अब तुम्हारी बारी है... हांय...

मंडळी, मुद्दाम कतॅ अहे शिल्पर घालॉन हारोडी, मामारा, पावन्या घारा, मित्रा घारा, जड-तडे सभेला जाऑन बगा, तडे लॉकाई नंदार पयली तुमशा पायोर आन मंग तुमशा तोंडोर जायदॅ, त्या डॉळ्यात तुमशाकरता “गरीब बिच्चारॉ” अहे भाव दिखॅद्यात.... एकदा करॉन बगा तॅ खरे...

# आठोन



**ख्रि. जॉना अंतोन रॉड्रिग्ज, अटोळी - नानभाट**

**जन्म :- ११ फेब्रुवारी १९३५**

**मृत्यू :- २६ सप्टेंबर २०१२**



**ख्रि. शांतियाग संज्याव डिमोन्टी, माडीभाट - आगाशी**

**जन्म :- २२ सप्टेंबर १९५४**

**मृत्यू :- १६ मार्च २०१३**

ज्यांचे मन तुझ्या ठायी स्थिर झाले आहे
त्यास तू पूर्ण शांती देतोस कारण
त्यांचा भाव तुजवर असतो. – यशया २६:३

**देणार :- श्री. अंतोन गोट्या रॉड्रिग्ज,**

**श्रेयस, अटोळी - नानभाट**

---

# प्रेमळ स्मरणार्थ



**ख्रि. सि. लुजान फिलिप परेरा, चौकाळा**

**जन्म :- २३ ऑक्टोबर १९६४**

**मृत्यू :- २१ सप्टेंबर २०१३**

स्वत:चा क्रूस वाहताना दुसऱ्यासाठीच जगलात
परमेश्वराच्या स्वर्गीय नंदनवनात तुम्हाला चिरंतन शांती मिळो
हीच प्रभूचरणी विनम्र प्रार्थना !

तुमचेच शोकाकुल,

**वेरोणिका रॉबर्ट परेरा, रसेल, शर्विन**

## मद्रास तॅ मुंबय विमान परवास - सायमन रॉड्रिग्ज, क्रॉसनाका, आगाशी

आयतवारॅ हांसॉ ७.०० शा दरम्यान वेलंकनीवरनॅ मद्रास एयरपोर्ट वरती आमे पोसले. सामान चेक इन करॉन आत मीनॅ बगीतॅ तॅ का... जडे ऑबडे लुंगीवालॅ दिख्याशे तडे जकले आपले वसयवाळॅस दिखातॉतॅ. त्यात बी ८०% कुपारी. जडे बगॅ तडे आपलास लोक दिखातॉता. ई जकला बगॉन मन भरॉन आला. आपला, मा हारका सादासुदा लोक पन आतॅ विमानान परवास करॅ लागले.

एयर इंडियाशा ९.१५ शा विमानामीनॅ खिरले आन बगीतॅ तॉ का ? आख्खा विमान कुपारी लॉकाय भरलॅ. जकले जाग्योर बेहेले आन घोष्ना जाली.. "पॉरांदो ! कॅप्टन बाबुकाका आन वाईस कॅप्टन अंद्र्या तुमा जकल्या स्वागत करतॅ. केबिन क्र्यु दुमी, उशी, मरी, पांड्या आन दुमा तुमशा मदतीदो हात..." जरा वेळ माव विश्वासुस बॅहलॉ नाय. ऑडॅत मांगॅ / पूडॅ दुमी, उशी आन मरी तांबडा लुगडा नॅहॉन आन पांड्या, दुमा पोन्या, कब्ज्या आन लाल टोपी घालॉन विमानात फिऱ्या लागले. मंग घोष्ना जाली, "आतॅ तुमाला पट्टॉ कहॉ लाव्यासॉ आन काड्यासॉ ता दावडतॅ." तॉड्यात मांगनॅ मिंगू आड्डालॉ "माला ऑ पट्टॉ पूरॅ नाय तॉ ? "पॉट कमी करा... असनी पॉटायी नांद केल्योर पट्टॉ यासॉ कॅय. मिंगूई दुमी बोयली. त्याला लगेस एक्स्टेंशन पट्टॉ हाडॉन दिलॉ...

"जर कय इमेरजनसी आली तॅ लाइफ जाकेट आहा घाल्यासा. अह्या नळीमीनॅ फुक मारॅशी. आन मांग विमानातनॅ उडी मारॅशी..." एयर होस्टेस दुमीनॅ सूशना केली. "वाये दुमे, ऑडा टाइम मिळदॅआ ला ? बाबुकाका विमान साल्वितॅ मींजॅ जरा घाबरॉस वाटातॅ... कडे विमान खाला-बिला पडला तॅ ला ? ई तडे केबिन मीनॅ बॅहॅलॅल्या बाबुकाकानॅ स्पीकरवरनॅ आयकीला... "शिमा मंग उद्या जक्ल्यांना एकूस टाइम द्यासा... हांसा ५.०० सा". ई आयकॉन मा मांगशा शिटवर बॅहलेल्या मेरी शीश्टरला नुसतॉ आवट आलॉ...

"जकल्याई नीट बॅहा. आतॅ विमान हूरॅसा." आन विमान सुरू जाला. थॉडॉ वेग घॅऑन थांबला. ई आहा ३-४ वॅळा जाला... "आयला विमान जाम जड जालॅ वाटातॅ... ऊडॅ नाय ता रॅ ?" अंदया बाबुकाकाला बोयलॉ "आपल्या लॉकाई ऑडॉ हळवॉ घॅटलॅ की विमान जड जालॅ... आन भांड्यायो गुनी बी वायल्यो..." मंग त्याई मांगनॅ धख्खॉ द्यादो बी विमान हाडला. मंग मांगनॅ धख्खॉ दॅऑन आमसा विमान वरती हुरला. बाबुकाका आन अंद्र्या घतीन हालातडुलात विमान एकदासा स्थिर जाला... आन आमशा जीवात जीव आलॉ.

"मंडळी ई विमान खास कुपाऱ्यांकरता हाय भगून आतॅ खास कुपारी शा पानी दिलॉ जायदॅ. खरा मीनजॅ डॉमॅस्टिक विमानात दारू वाटीली जाय नाय... पन आपुन कुपारी कुनॅ कॉडाही हांगीला तरी प्रोग्रामला जही दारू वाटीत्याव तही आमॅ पन खास GT ब्राण्ड वाडत्याव.. (ऑ ब्राण्ड का हाय ता थॉड्या फार तज्ञ मंडळींना माईत हाय). आन मंग वाड्यादो बाबुकाकाव जावाय हाथामीनॅ पईट अन शाव्ने घॅऑन आलॉ. ज्यांना घॅशी होती त्याई घेट्लि. मंग जिवान आला. ताटात ४ रोटयो (वडॅ), कडोल्यातसा शिकन, आन सील पॅकमीनॅ शीषवनी आन धान आहा जकला आला. वेलंकनीला आपल्या कॅटरर्ससा बिन वासा, बिन सवा ५०० तॅ ६५० रूपासा जिवान खाऑन कंटाळलेले जकले त्या खान्योर तूटॉन पडले. "दुमे माला अजून थॉडा धान आन कालवान पावता ला" शिमानॅ वरसा बटान दाबॉन दुमीला बोलविला.. "शिमा ! अडे माहना हिशेबान लिमिटेड जिवान हाडलॅ रॅ". शिमानॅ त्या वाट्या आन आजूबाजूशा २/४ जना वाटयाय शाव्ने पॉटात ढकलोते., त्यापायान त्या पोटात आग पाड्लोती... पन नाईलाज हॉतॉ. जिवान जाला आन थॉडॅ वॅळान वगळ शा आन पानगॉ आलॉ. "जकल्याई जाग्योर बॅहा... पावसाळी वातावरन हाय भगून विमान हालदॅ.. पन कुनॅ घाबरॉ नाका.." बाबुकाकानॅ घोष्ना केली. खरा मीनजॅ विमानात सामान भरताना एका बाजूनॅ हळवॉ जरा जास्ती भरलॉतॉ त्यामुळे विमान जरा तिरका जाल्ता. पन बाबुकाकानॅ वेळ निभाऑन नीली. "मंडळी ! विमान मॅ आपल्या तुखाडीओरती नातॅ खारीमीनॅ उतरविलॉसा पन आपल्या अडे लाइट जातॅ आन काळोखामीनॅ कय कळॅसा नाय भगून मॅ आतॅ मूंबयलास उतरवितॅ." बाबुकाकानॅ घोष्ना केली "अंद्र्या विमान खाला टेकविला गा ब्रेक ब्रिक मारॅसॉ नाय, हळव्या वजनाय ता आपोआप थामबॅदॅ." आहा बॉलॉन विमान CST (कोसू शिलू तुसकान) एयर पोर्टवर उतरविला.

"मंडळी ! आपुन पुडशा वहरा जाताना आन यॅताना माकून भॅटॉ, पन बूकिंग शिमा दरीस कऱ्या लागॅदॅ." अही घोष्ना आयकॉन जकले विमानाबार पडले आन समान घ्यादो बेल्टवर पोसले. ५ नंबर बेल्टवर सामान आला. पन हळव्या वजनाय तॉ बेल्ट ५ वॅळा बंद पडलॉ... त्यामीनशी हळव्याय भरलेली बॅग आन भांड्याय भरलेली गून खांदयोर मारॉन शिमा खुशीत एयर पोर्टशा बायार आलॉ.

**जकल्या कुपारी बंदवांना आन बेनींना नाताळशा हनायो शुभेच्छा**

## डॉ. निलम गोन्साल्वीस, खिवणी

एम. बी. बी. एस. / डी. एन. बी. (कुपर हॉस्पिटल, मुंबई)

**त्वचारोग तज्ञ**

**त्वचारोगासंबंधी उपचार व शल्यक्रिया**

चामाखीळ काढणे, तीळ काढणे, भवरी काढणे, लहान टॅटूवरील उपचार, कान शिवणे, त्वचेची अॅलर्जी, कुष्ठरोगांवर उपचार, गुप्त रोगांवरील उपचार, केस व नखांसंबंधी उपचार

**कॉस्मेटो डर्मटोलॉजी -**

केमिकल पिल्स, स्कार ट्रीटमेंट आणि काळ्या डागांवरील उपचार व फेस ग्लो

**पत्ता -**

सेंट झेवियर कॉन्वेंट हॉस्पिटल

होली स्पिरीट चर्चजवळ, नंदाखाल, विरार (प)

**सोमवार ते शनिवार**

संध्याकाळी ५.३० ते ८.३० वाजेपर्यंत

भ्रमणध्वनि - ७७३८०१६१३३ / ९९२०९५९२३०

---

Sachin Dodti
9881595955

little Bite
The Cake Shop

Shop no.15, Himalaya Bldg, Station road, Nallasopara (w)

Shop no.3,House No.3, Ground Floor,Samadhan, Opp.Samaj Unnati Mandal, Manickpur, Vasai (w), Dist-Thane, 401202

*Make your occassions.... More Delightful !!!*






आमशा अडे बड्डे केक आन लग्नाव केक त्यासबरबर पफ / पेस्ट्रीज (चॉकलेट, बटरस्कोच, वाईट फॉरेस्ट, ब्लॅक फॉरेस्ट) / प्लम केक / खजूर आन अक्रोड शा केक शो ऑर्डर घेट्ल्यो जात्यात

**खास आकर्षण - आमे फोटो फ्रेम केक पण बनवित्याव.**

# उतळी पडले

- राजन डिमेलो, आगाशी क्रॉसनाका

उतळी पडले रॅं, उतळी पडले, त्याला उतळी पडले
बातमी येतॅ कतॅ, आन पॅडॅ वाटीतॅ कतॅ,
आली रॅं आली वार्ता आली.... "बाबू जालॅ",
बरोब्बर दॉपारशी २.५७ ला डिलीवरी जाली... भारीस !
पॅडॅ वाटीलॅ रॅं वाटीलॅ, बरॅ पाव्ने शार किल्याय पॅडॅ
वाटीलॅ... मायशा मारी तॅ..!

उतळी पडले, आतॅ मम्मी-पप्पाला उतळी पडले,
'बाबू" दोन अडीस मयन्या हॉतॅ कतॅ आन बाळटीम
करतॅ कतॅ,
जाला, एकदसा बाबू सव्वा दोन मयन्या, मिळाले
"मदरीन-पदरीन",
(ज्या तॉड नाय, त्याई... बग्याशी पाळी आली तॉ
प्रश्न वॅगळॉ, पन मिळालॅ)
बाळटीम जाला, शार-पाश्शे लोक बोलविला, बॉड्डॉ
कारिक्रम कॅलॉ....
जकला एकदम मना हांगडा...!!

आतॅ पयलॉ वाढ-दि (.. सॉरी.. वाढ-दि नाय.. कारन
वाढ-दि राटा बरबर गेल्यात, आन आतॅ बड्डे
आल्यात)

उतळी पडले, आतॅ फर्स्ट बड्डे येतॅ कतॅ आन साजरॉ
करतॅ कतॅ,
आलॉ,आलॉ बड्डे आलॉ, बाबू जाला वहरा, मॉजेनीससॉ
केक.... कापीलॉ,
एकदासॉ 'प्रोग्राम' पार पडलॉ....!!

(आतॅ खपला, आतॅ कयूस नाय आहा तुमाला वाटॅदॅ...!
ऑ विसार करत्यास कहे.... कॉमसार हाय ता...!
गाई नाय वाटातॅ तुमशा...)

मम्मी-पप्पाला उतळी पडले, कॉमसार येतॅ कतॅ आन
प्रोग्राम करतॅ कतॅ,
बाबू तीहरीला गॅलॅ, कॉमसार आला, प्रोग्राम कॅलॉ...
जकला हारका-हुरका पार पडला...!!!

वाये, का हांग्यासा, माकून यांना उतळी पडले,
बाबू दाव्विला जातॅ कतॅ आन पास जाल्योर प्रोग्राम
करत्याव कतॅ,

जाला बाबू दाव्वि जाला, ९१.६५ % मार्क...
"लिमिटेड प्रोग्राम" जालॉ, तरी शे-सव्वाशे लोक....!!!!

आतॅ बाबूआ पुडसा शिकशान, मंग नोकरी आन
त्याला छोकरी बग्याशी,..
जक्लिस धावपळ.... मम्मी पप्पाई....

आतॅ नोकरीला लागातॅ कतॅ आन बाबूला पोरी बगीतॅ
कतॅ
"एंगेजमेंट प्रोग्रामसॉ" बार उडवितॅ कतॅ....

जाला, बाबूआ शिक्षान जाला, नोकरी लागली... छोकरी
पन मिळाली...
"एंगेजमेंट प्रोग्राम" कॅलॉ, दोन-शारशे जमलोते...
ओ (सूनबाय) ला अडीस तॉळ्याव हार पन कॅलॉ...
(गावात कुनॅतरी त्या ऑबायदो सव्वा दोन तॉळॅव हार
कॅलतॉ...)

लगीन पुड्शाला, पन लग्नाई तयारी आतॅ पासूनुस..
कारन का..?
कारन ताहा कय विशेष नाय, पन मम्मी-पप्पाला
उतळी हांबळॅ नाय...

"बाबू"आ लगीन आटपाला, बरॅस उडविलॅ, रिटायर्मेंट्शे
आलतॅ ना...
लग्नानंतर ४-५ वहरात... नातवंडाय घर भरला, नवी
पिढी, नवॉ वेळ... नवॉ खेळ...!

आयुष्यभर पॉराकरता (बाबू) "उतळी पडलेले" मम्मी-
पप्पा,
थकले-भागले, आतॅ घरातशी अडगळ बनले...,
मंग बाबूनॅ नवा घर बांदिला,
मम्मी पप्पा जुन्या घरात, पॉर नव्या कुटुंबाहरी
आपल्या नव्या घरात..........
पॉरानॅ मम्मी-पप्पा वायले टाकील्यात, आन
आतॅ त्याला उतळी पडले....

ये (मम्मी-पप्पा) एकदा खाश्या कड्या जात्यात
कतॅ...,
आन मॅ हातवॉ करतॅ कतॅ...!!!!!!

## विशेष आठोन

स्व. फिल्याबाबा आन काळूबाई

स्व. गडूबाबा आन मनीबाई

**नाताळशा हनायो हार्दिक शुभेच्छा**

सेरा, एडल, ऑरीना, कॅनिस

सि. मिनल SRA आन

मनीषा कुटुंबीय, परसांव

**जकल्या कुपारी बंदवांना आन बेनींना नाताळशा हनायो आन नवीन वह्वारायो शुभेच्छा**



## आरॅ फरशाला का जाला ????

**- सेविन तुस्कानो, घोटकाल, नंदाखाल**

(ग्लोरिया बार हॉथॉ आपल्या वसयशा रस्त्यात तडे आपलॉ फरशा रोजसॉ गिराईक हॉथॉ. एक दी फरशा चक्कर यॅऑन पडलॉ. घारा ४ दिहान उठलॉ. त्यानॅ घरशी गत बगिलीआन तिगाळा बोयलॅलॉ ऑ गानॉ.. ग्लोरिया गान्या सालीमीनॅ)

आरॅ फरशाला का जाला ????

वसयला माल घॅऑन गॅलतॉ
येताना बार मीनॅ बॅहॅलतॉ - २
कुहनॉ बार ?????

ग्लोरियाssssss - ४

पॅऑन पॅऑन तू फुगल्या रे
फुकाट खाऑन माजल्या - २

बायकू पॉरायी विलेवाट - २

सावसाराऑ तूऑ ताल बिगाडलॅ...बिगाडलॅ -

ग्लोरियाssssss - ४

केळीत तूआ हिपना नाय
काकड्या मॉगऱ्याला भाव नाय - २

काकडॉ उफळॉन खडॉन गॅलॉ - २
राजळी केळ तूयी कॉथाडले... कॉथाडले.....

ग्लोरियाssssss - ४

बायकू आन पॉर माला पाय रे
आन दारूला आजपासून नाय रे
फारशा सुधारनार हाय रे
आन दारूला आजपासून नाय रे
तॅ बॉला ग्लोरियाsssss - ४

---

## बाबा हांगतोतॉ

**- राकेश परेरा, हांबोडी, आगाशी**

माऑ बाबा माला हांगातोतॉ,
"पॉरा बियर पॅऑ नाका"
मॅ छाती पूडॅ काडॉन हांगीलता,
"बाबो, मा टेन्शन घॅऑ नाका"

बियरशी विस्की, विस्कीई गावठी
कतॅ हॉअॅदॅ कळॅसा नाय.
कॉडा जरी वाटला तरी मांगॅ तूआ बळॅ वळॅसा नाय..
आज दारूला तू पेता, उद्या दारू तुला पेदॅ..
तुला कळॅसास नाय दॅवळा दारा तुला कतॅ नेदॅ..
दारू करनाऱ्या कतॅस नाय भला जाला पन
पॅनाऱ्या घरदार पयला वाला

बायकू पोरे तूए बारा भावाला लागॅद्यात,
नाय तॅ डाग तूआ कुळाला जडेद्यात...
नोकरी धंद्याव तूऑ कय ठिकानॉ रॅसॉ नाय
कमाई कय नाय आन आनॉ खिशात वरॅसॉ नाय..

"बाबो ! तूई जीब हुकले तूआ कुडी माती काळी जाले
काल तू जडॅ हॉतॉ तडॅ आज माइ बॅहॅशी पाळी आले.."

आज मॅ मा पॉरांना हांगातॅ,
"पॉरा बियर पॅऑ नाका"
"बाबो ! तू मा टेन्शन घॅऑ नाका"
माव पॉर माला हांगातोतॉ...

---

## .कादोडी भाषा -- **वॉल्टर तुस्कानो, मेदोडी**

'कय' ला का? 'का' ला कादो...??
धानोर रस बुंबलाव, पॉरा सल जिव्यादो
कुपारी भाषा... पयला हाड, मादो जिव्यादो
रॅला तॅ बांद माआ बाबादो...
बैलाला टोपीली नाथ...
खुळ्याला मार परानी..

गाड्याला आन राटाला माखुंडा..
राटाआ बैलाला डॉपॅन्ना
हाळांब्यात कोंबडी, टोपल्यात पिलोटे
बुकूलित मांडीले गळमुंडीए ताते
हॉपारशे कांदॅ, तळयोरशे बटाटे
बाळटीआ सॉपादो कडनॅ हाडॉ पिलोटे...??

## जकल्या कुपारी बं्दवांना आन बेनींना नाताळशा हनायो शुभेच्छा

**सिबल आल्मेडा, ACA**

**मोबाइल - ९०११७७८०९२**

**मिनल मेंडीस, ACA**

**मोबाइल - ९०११८३५७२०**

## चार्टर्ड अकाऊंटन्ट्स

---------------------------------------------------------------

**ऑफिस -** जी १, खालसॉ मजलॉ, पार्क व्यू, पंचमुखी हनुमान मंदिरा मॅर, एसटी डेपो रस्तो, नाळाहॉपारा (प) - ४०१२०३

# हॅगाट

- बेर्नादेत रुमाव, बोरीवली

"आतॅ बय सा पन हॅगाट वरती जासा गा का ?" सुलीपुडॅ धाव्वात येत पोरीनॅ माला प्रश्न विसारलॉ. तिगाळा ती तीहरीत होती. आठ - साडे आठ वहरयी हायदॅ.

आमशा दापुडशी डोकरी काल रातशी मेली. डोकरी तही बरी कडाक होती. काल हांज परयंत बॉलात-सालात होती. दी मावळल्योर ऑबायनॅ शा सॉ पॅलॉ आन दोन पाव दीलॅ, तॅ मॉम... मॉम करीत डोकरीनॅ खालॅ. भॉड्डॉ पॉर, मन्या कामोरसॉ आलॉ, तॉ बयला बॉलॉन गॅलॉ. तव परयंत डोकरी बेस खास्थि. पन रातशॅ दा वाजता डोकरीऑ 'मांडव मॉडलॉ'. डोकरीनॅ जकल्याइ रजा खाली. असो.

हाकोटे नवसा 'यंतार' जाला. वजॉवटॉ करॉन आमे जकले अकरा - साडे अकरा पोत घारा आले. राती जागरान जालता पटकान सयपाक कॅलॉ आन हवारीस जीवॉन जकल्याई आंग टाकीला.

आतॅ दी मावाळलॉतॉ आन मॅ मा हांशापारशा सयपाक पान्या तयारीला लाग्लोती. तडनेस हाकोटशा डब्यायी तयारी सुरू होती आन मायी पोरी तीऑ प्रश्न घॅऑन आल्ती.

"हॅगाट मिंजॅ? माला कय कळाला नाय बाबू.... तू का हांगाता ता ? उकंदी साफ करता करता मॅ मा पोरीला विसारला.

"त्या दिहा तू माला का हांगीलता ?" तीनॅ मालास प्रश्न कॅलॉ मिंजॅ तीस मायी 'बाई' जाली.

कतॅ? मॅ कतॅ का हांगीलता तुला ? अडॅ मा गांडीआ हुटलॅ ता बांदयादो माला वेळ नाय, आन मॅ तुला कतॅ क हांगीला?" कांदॉ कापिता कापिता आन डॉळॅ पुहित पुहित मॅ जरा वैतागॉनुस बोयली. "अडॅ कामाव काशलॉ पडलॅ आन बाबीला नाय तॅ सतराशे साठ प्रश्न पडल्यात."

"मम्मेsss तू कय मनजॅ कय कामायी ना ? "आपलॉ बारकॉ हात कपाळॉर नेत माय पोरी माला हांग्यादो लागली. "त्या दिहा इंडिपेंडन्टस डे शा दिहा.... आपुन देवळा गेल्ते... आन मॅ तुला एक question विसारलॉतॉ ?"

"आला रांडे, तूआ पोटोर नांगर वालॉ तॅ, पटकान हांग गनी, मम्मीया टाइम हवातॅ गनाय." हुकट साफ करीत बेहेलेली मायी हाऊ पटकान बोयली. तही माई एकलीशी एकली लेक रागावली.

"तुमे कुनुस मा आयका नाय. तुमाला कुनाला मा आयक्यादो वेळूस नाय. पन सॉता कहे बॉलात्या... पुटू... पुटू.... पुटू. मॅ आतॅ सालली॰" आन गुगली टाकॉन पाय आपटीत पोरी रागाय निगाली ताहा हाथातस्सा काम टाकॉन मॅ तिला वॅंग्यात घॅटला. "बाबी सॉरीsss. हांग. मॅ तुला का हांगीलता. मा आठोनीओर पॅंडॉ पडलॅ गनाय."

"पॅंडॉ पडलॅ मिंजॅ ? जनु कय मराठी प्रश्नपत्रिके मीनसॉ 'अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा' ऑ प्रश्न तिला मा दरनॅ समजॉन घ्यासॉ हॉतॉ.

"आदी तू का हांगातोती ता पयला हांग. मंग 'पॅंडॉ पडलॉ' मिंजॅ का ता मॅ तुला हांगॅनॅ."

"इंडिपेंडन्टस डे शा दिहा... आपुन देवळा गेल्ते. आन मॅ तुला एक question विसारलॉतॉ की मम्मी आज कुहनॉ हन हाय ? तॅ तू हांगीला 'आज मरिया मावलीआ स्वर्गरोहन हाय.'' "मिंजॅ ?" मॅ विसारला तिगाळा तू का बोयलती...

"का ?"

"आतॅ खॉटा नाका बॉलॉ. तू हांगीलता की 'स्वर्गरोहन मिंजॅ मरिया मावली "शरीरा हॅगाट"वरती स्वर्गात गेली. तिला दॅवानॅ वरती अल्लास टूकॉन घॅटला. मंग डोकरी बयसा पन 'हॅगाट' वरती जासा गा ?"

"आतॅ मा डॉख्यात बल्ब पॅटलॉ. पोरीला 'हॅगाट' शब्दाव नीट अर्थस कळालॉ नॉतॉ. मंग मॅ पोरीला वॅंग्यात घॅटला, सयपाक बाजूला ठवीलॉ आन सगळा सविस्तर हांगीला. आज 'सयपाकोर पॅंडॉ कहॉ पडलॉ' तापन समजॉन हांगीला.

पोरीमुळे माला कळाला गा, "आपली भाषा आपुनुस जागविली पाय. जीती ठविली पाय. आपल्या पोंरा-पारांना हिकविली पाय. नातॅ एक दी 'बायशा हॅगाट' आपली संस्कृती पन जायदॅ."


काल कामोरशी घारा आल्योर पोरी हांगातोती, 'मॅ ऑफिस मिंनॅ मोबाईलवर बॉलातोती तॅ तडनॅ मॅनेजर जातॉतॉ तॉ थांबलॉ आन माला विसारला 'what's your language?" (ई कुहनि भाषा?)

"It's 'कादोडी' my mother tongue." (ई कादोडी माई मातृभाषा)

It's sound different; i heard it for the first time. Good." (ई आयकॅदो वेगळी वाटातॅ. मॅ पयल्यांदास आयकिली. मस्त हाय)

पोरी मनातशा मनात हावली, कारन ती मॅनेजर विषयीस बॉलातोती.

**जकल्या कुपारी ब्ंदवांना आन बेनींना नाताळशा हनायो शुभेच्छा**



# शालोम कुटुंबिय

पहराव

अब्राम नाका

**<u>ॲनारा नवा वहरी तुमा जकल्यांना भरला सरला जाओ</u>**

# वरमाय भरलीस गेली – **सत्यकथन - श्रीमती मर्शान लुईस मच्चाडो (वरमायशी पोरी)**

**लिखान - मृणाल विजय मच्चाडो मशादआळी, नंदाखाल**

लग्नाई धामधूम सालू होती. अयलॉ पयलॉ पॉर वराडातॉतॉ. ५७ वहारा आदीसॉ काळ. त्या काळात लग्ने पास-पास दी पुरातोते. हीनवारॅ हांज्या लागॅसा. आयतवारॅ मांडव. हॉमवारॅ लगीन. हीनवारपासूनुस तळने सालू. हीनवारॅ दॉपारास हॅजाळ्यात्शो बायको आलत्यो, पीठ घाल्या लागल्योत्यो. रुमावशा अंद्रूऑ मांडव घायलतॉ आन बाजॅ पन त्यायेस कॅलतॅ. ‘वरमायशे’ वारने सुरू होते. “तॉ काळ” त्या काळात नाय रिक्शा नाय गाडी. त्या काळात बामनाई गाडली मांगॉन, त्यामीनॅ वरमाय वारने करॅदो फीरॅशी.

तांबडा लुगडा (पाटोळ्या कानीआ) गळयामीनॅ ठुशी, हिरान, गाठला, गहरळी, दुलडी, बॉरमाळ, पाशीहार. हाथामिनॅ हॉनॅयो बांगड्यो, पाटल्यो, कॉपऱ्यापरयंत काळय. बॉटात हॉनॅय वाकाडॅ. माथ्यामीनॅ गुलाबफुल, गुलशडीऑ झॅलॉ. त्याला तीन गूफॅ. एक आंबोल्यायी माळ. खांदयोर सोळी कापडा आन त्योर पांड्या कापडाई घडी.

अहीस नटॉन थटॉन ईपन वरमाय गाडलीत बॅहॉन बोळींजा मामहरॅतडे शेवटसा वारना करॅदो गेलती त्या काळात.

दा भावंडाई जकल्यात बोठ्ठी बेन खानदानी घरान्यातशी शार हाऊ हरॅयी अयली पयली ‘ऑबाय.’ आन सॉता हाऊ हरॅयी एकुस लाडकी ‘ऑबाय.’ घरनॅ-मायारनॅ ऑबाऱ्या-मॉबाऱ्यायी, जकल्यायी करती धरती बेन. भावंडायी जाम लाडकी, शार पॉरायी वाढविती, जकल्यांना मान-पान दॅऑन सलनारी. हाऊ हरॅ काळजाऑ तूकडॉ.

“माघ” मयनॉ २ फेब्रुवारी १९५६ भर दॉपारसा जीवना टाइम, मामहरॅ गावशे वारने खपवॉन मामहरॅ घारा जिव्यादो याशी होती. वरमाय दापुड्शा घारा वारन्या सडली, त्या घरशो बायको सुलीपुडॅ जिव्यादो बेहेलत्यो. वरमाय त्यांना हांगातॅ तुमे जीवने आटपा मॅ अडे पोरीआ मॅरॅ बॅहॅतॅ. ओहरीतशा खाटयोर एक मयन्यायी पोरी खॅळातोती, वरमाय पोरीला खेळवित बेहली. सुलीपूडनॅ बायको जीवने आटपॉन येत्यात आन बगीत्यात तॅ “ई” का? वरमाय पोरी मॅरॅ कड्या वळाले. बायकांना वाटला वरमायनॅ थॉडा वॅळ आंग टाकीलॅ गा का ? बायकांई वरमायला उठव्यासॉ प्रयत्न कॅलॉ पन... वरमाय कड्या कडशी वळाल्ती वरमायसॉ बॉठ्ठॉ घात जालतॉ. त्या काळसॉ हाडफेर मीनजॅ आतॅसॉ हार्ट फेल.


जा कतॅ घडला नॉता जा कुनॅ ऐवजीला नॉता, जा कतॅ कुनॅ आयकीला पन नॉता तास घडलॉता. जकला लोक घांजा पिंजा जाला. लॉकांना कईस कळात नॉता. वाऱ्याहारकी बातमीपसारली. जड्ने-तड्ने लोक बोळीजशा रस्त्याला लागला. जड-तडे लॉकायो फुन्ड्यो भरल्योत्यो कारन जालतास ताहा. वरमायशो बेनी, सगॅशो बायको पीठ घालता-घालता निपल्या पीठा हाथाय बोळींजशा वाट्या पळात निगाल्यो. जडने वाट मिळदॅ तड्ने, कुन वेहितनॅ, कुन काट्या-कुट्यातनॅ, पाय नेदयात तंहे जकले धावतोते.

ज्या गाडीत बॉठ्या हौशेन वरमाय निंगालती, त्यास गाडीत तीया मरान आल्ता.

घायलॅलॉ मांडव मॉड्लॉ, घायलॅलॉ पीठ मिंगारशा बावखालात होळ्ळॉ, लगीन शारदी पुडॅ डखल्ला. वरमाय तंहीस भरल्या माळीनॅ पेटीत ठविलती, जंहि दॅवा घारा वारने करॅ साललती. हावू-हरॅव अवतार गॅलॉ, नवऱ्याव संसार गॅलॉ, पोरांइ बय गेली, आंगाट नाय लॉगरा नाय आख्खी केळूस मोडली. गॉठ्याशे ढोरे रडले, वईसॉ मॅढॉ पन रडलॉ. ९ तारकीआ लगीन १२ तारकीला धरला. नाय बाजे नाय नास-गाना.

आन सगळ्यात बॉठा दूख मिंजॅ शार दीहानंतर नंदाखालशा देवळामिनॅ, बयशा खाशीमॅरनॅस तिओ पॉर लगीन लाव्या साल्लोतॉ. त्या पोरा जीवासा का जाले हायदॅ?

(इ सत्यगठना ७ फेब्रुवरी १९५६ ला घोटेभाट गावात घडलोती. वरमाय जेबिबाइ शिमा कोन इ पॉरा लग्नात यॉ घात जालतॉ. जेबिबाई इ रुमासतडशा पेद्रु रूमावशी बोठी पोरी आणि फा. जॉन रूमावशी बोठी बेन. इ गठना हांग्यासा कारन की तिऑ पॉर, ज्या लग्नात ती मेलती, तॉ फ्रांसिस शिमा कोन या १२ ऑक्टोबर २०१३ रोजी मयत जाला, तिगाळा ५७ वहरा अगोदरश्या या दुःखद गठनेइ याद जाली.)




# Ni3 TRAVEL POINT

HOTLINE:-24 HRS. 9762355060, 9224159732, 8007846010, 95250–6928487

**१) नाशिक सहल दिनांक ०८ व ०९ फेब्रु २०१४**

**<u>बाळ येशू दर्शन</u> :-** १) तीन नॉनवेज बुफे जेवण, २) दोन ब्रेक फास्ट, ३) ए. सी. बस सहित, ४) तीनच्या ग्रुपने रूम. **प्रौढांसाठी २६००/- मुलांसाठी २४००/- (५ ते ११ वर्ष) व ५ वर्षाखालील मुलांसाठी १०००/-**

**२) अमृतसर - जम्मू - काश्मीर - श्रीनगर - पेहलगाम - गुलमर्ग - सोनमर्ग**

ट्रिप १ :- दिनांक ४ मे २०१४ ते १३ मे २०१४

ट्रिप २ :- दिनांक १५ मे २०१४ ते २४ मे २०१४

सहल प्रवास व वैशिष्टे :- १) मुंबई-दिल्ली राजधानी प्रवास, २) दिल्ली-श्रीनगर विमान प्रवास, ३) ४ रात्रीचा श्रीनगर व १ रात्रीचा पेहलगाम वस्ती, ४) १ रात्रीचा हाऊसबोट अनुभव, ५) मुगल दरबार रेस्टॉरंटमध्ये काश्मिरी जेवणाचा अनुभव, ६) पेहलगाम - जम्मू घाटप्रवास अनुभव, ७) जम्मू - अमृतसर स्लीपर ट्रेन प्रवास, ८) अमृतसर संपूर्ण ए.सी. प्रवास व वस्ती, ९) अमृतसर - मुंबई ३rd ए.सी. प्रवासहित

**प्रौढांसाठी २५०००/- मुलांसाठी २३०००/- (५ ते ११ वर्ष) व ५ वर्षाखालील मुलांसाठी १००००/-**

**संपर्क :-** नितीन लोपीस, "ग्रेस पॅलेस", भाटी - नानभाट, पोस्ट - सोपारा, तालुका - वसई, जिल्हा - ठाणे, पिन - ४०१३०४ (९७६२३५५०६०, ९२२४१५९७३२, ०७७०९१९०३१२), Ni3.lopes@gmail.com

## मा खास मयतरनिया लगीन

**- डॅनियल मस्करणीस, मर्देस वाघोली**

तीआ लगीन ठरलॅ. आतॅ फक्त तीआ लग्ना जाना आन तीआ कवतुक करना ऑडास मा हाथात रॅलता. जिगाळा माला तीआ हैरा हॉनार हाय आहा कळाला, तिगाळास मॅ एकदम सुन्न जालॉ. माला कय सूशॅसास रॅला.

माला आठवातॅ, ॲकदा ती तीॲ डॉळॅ पुहीत पुहीत मा दरी आल्ती. तीऑ कून तरी 'खास फ्रेंड' बोटीयोर जा निंगालतॉ... तॉपर्यन्त मॅ विसारूस कॅलॉ नॉतॉ गा तीऑ 'खास फ्रेंड' एक पॉर पन अहु शकातॅ मनून.. !! माला वाटातॉता गा मॅस तीऑ 'खास फ्रेंड' हाय आन आमशी मैतरी या जकल्या पलीकडशी हाय भगून... पन तिला तीआ मितरा बोटीयोर जान्यामुळॅ जालॅला दुख बगॉन माला तीआ त्या मितराव जाम हॅवॉ वाटलॉ. मॅ मायो भावना तहयोस मॅरॅ ठवॉन तीआ सांत्वन कॅला.

तीआ लगीन जहा जहा जवळ येतॉता ताहा ताहा मा रुदयात कय तरी हॉतॉता. ती आतॅ कायमशी मापासून लांब जाशी आन आमशी ऑड्या वहरायी दोस्ती कमी हॉयॅशी ऑ विसार करॉन माला जामूस दुख जाला. ती लग्ना दिहा त्या पांडऱ्या गाऊनमीनॅ ॲका परी हारकी दिखातोती. ती ओडी सॉबातोती यी माला त्या दिहास कळला... ज्या माहनाव मॅ हॅवॉ करतॉतॉ त्याऑस हाथ धरॉन ती चर्चशा बार येतोती... ती आतॅ विवाहबद्ध जालती. एक नवरॉ-बायकू मनून त्या दोगायी आतॅ ॲका नव्या परवासाला सुरवात जालती. आन ती माला कायमशी परकी.

हांच्यापारा तिला तीआ नव्या घारा न्यादो जिगाळा त्यायी नावळ आली तिगाळा मॅ मांडवामीनॅ खाला मान घालॉन कॉपरॅत ऊबी हॉतॉ. माला खूप उदास वाटातॉता... मान थोडी वर टुकीली आन वर टूकॉन बगीतॅ तॅ का... ते दोगे मास मॅरॅ या लागलोते. ये आतॅ मा मॅरॅ कदो या लागल्या हायद्यात बरा...?? तिला शेवटसॉ निरोप कहॉ द्यासॉ यीस माला सुसात नॉता... माला शब्द्स हापडात नॉतॅ... पन शेवटी कयबी अहो, जिगाळा मायी पोरी आन माव जावाय मा दरी आले तिगाळा त्यांना वेंग्यात घॅऑन मनापासून आशीर्वाद दिलॉ. ती माओर बगॉन जाम रडातोती.... मॅ तिला बोयलॉ.." पोरे रडॉ नाका, मॅ तूआ बरोबरूस हाय." तीनॅ रडात पुन्ना माला जॉक्कॉन मिठी मारली. मंग ऑडॅ वॅळ धरॉन ठ्यलॅलॅ माय आहु मॅ मा डॉळ्यातनॅ वाऑन दिलॅ....

---

## हांबाsss !!!

**- एडवर्ड डिसोझा, सोजआळी, वाघोली**

"आमे हाव तव पोत ये तुमशा नंदऱ्या पड्यात, नंतर 'हांबा' का ता कुना गाई पन या नाय" ॲका काकानॅ बोयलॅलॅ यॅ शब्द नुसतॅ काळीज कापीत गॅलॅ.

"हांबा..." "हायिक....." हॉ मॅर... बग तॉ....!! ॲकामॅरॅ.... सल ॲकामॅरॅ...!!

यॅ आन अहॅ खबशॅ शब्द अगदी १० - १२ वहरापर्यन्त आपल्या कानोर हमखास यार्शॅ.... आतॅ पन येत्यात पन खूप कमी. आतॅ ता जकला ईशटॅल गॅला. काईकांइ विकीला तॅ काईकांइ नूसतास ठवॉन दिलॅ.

आपलॉ समाज भाटात खपॉन्स भॉटॉ जालॅ. भाटात खपॅसा मीनजॅ त्या करता माहने, जनवारे लाग्याशे. तिगाळशा जमान्यात एकत्र कुटुंब अहल्यामुळे माहने होते आन जनवारे पन घरशेस. तिगाळशा काळात प्रत्येका घारा गाय, भय, बैल नातॅ खूळॉ अहे जनवारे अहयाशे. या जनवारा पायोरूस आपल्या वाडवडलाई वहरीभर पुरदयात ऑडॅ साउळ पिकविलॅ. संसार सलदॅ ऑडॉ बजार कॅलॉ जोडीला दूध पन विकीला रॅलॅल्या दूधायी थडी जमवॉन त्या साजूक तूप पन कॅला.

ये जनवारे ठव्यादो घरा मांगॅ एक गॉठॉ अहॅसॉ. त्याला वरती माळॉ करॉन पॅंडॉ नातॅ गवात भरला जासा. ॲका कॉपरॅत खराब भरॉन ठवीलॅलॉ अहॅसॉ. जनवारांना पॅंडॉ, खराब खा घाल्यादो गवान पन बांदॅशी. अहया या गवाणीत उबी रॅऑन जनवारा डोख्योरनॅ हात फिरविताना जनवारां बरबर आपल्या मनाला हॉनारॉ आनंद कुनालास शब्दात हांगता यासॉ नाय.

भाटात खप्याशे भगून आपला लोक काळोख्खाय उठॉन शा-पान्या आन भाटात जाशा तयारीला लाग्याशे. थॉडा उजडला गा गॉठ्यातनॅ "म्हॅ...!" आवाज यादो सुरवात हॉयाशी. मंग घरातसॉ कुनतरी त्यांना प्यादो पानी आन खादो गवात नातॅ पॅंडॉ घाल्याशे. कायिक जन त्यांना हिवरात साऱ्या हॉडॅशे. सादारन नवेक वाजता त्यांना पानी प्यादो दयाशे आन त्या आंग धव्याशे. या जनवारांना 'डाहा' जाम तरास दयाशे भगून आंग धव्याशा नातॅ दूध काड्याशा वेळी एकजण नुसतॉ 'डाहा' मारॅदो मॅरॅ उबी रॅसॉ. जिगाळा जनवारे साऱ्या न्याशे त्या वॅळात घरशो बायको गॉठॉ साफ करॅशो. धव्याशो. हॅन टोपल्यात भरॉन खानीत टाक्याशो नातॅ हिवारात नॅऑन हेनी घाल्याशो. योस हेनी आंगाव पानी तापव्यादो, सयपाकायी सुल पॅटव्या वापरॅशे. कायिक जनाइ अहयो हेनी सॉरॉन हिवारातूस बांडी भुजिले.

With Best Compliments from

# M/s. Ericson Logistics

**Sanjay D'Mello**
Proprietor

**Customs Import / Export consultants**

101, ROSE VILLA, 1ST FLR, SUTAR PAKHADI, NEAR AIR CARGO COMPLEX,

ANDHERI -E, MUMBAI -99

TELEFAX NO.26817776, 9821216501

---

With Best Compliments from

# M/s. Ryan Logistics

**Danny D'Mello**
Proprietor

**Clearing & Fright Forwarding Air & Sea.**

101, ROSE VILLA, 1ST FLR, SUTAR PAKHADI, NEAR AIR CARGO COMPLEX,

ANDHERI -E, MUMBAI -99

TELEFAX NO.26817776, 9870332885

या जनवारांबद्दल एखाद्याला अहलॅला प्रेम कुठपर्यंत जाऊ शकातॅ याविषयी माव अनुभव. “आमशा घारा तिगाळा बैलाई जोडी होती. जवळ-जवळ ६-७ वहरे त्यायी आमशी आन आमे त्यायी सॅवा केली. त्यातसॉ एक बैल जरा डॉकरॉ जालतॉ आन दूहरॉ थॉडॉ हळू सलातोतॉ भगून आमे बैल विक्या काडलॅ. सौदॉ नक्की कॅलॉ आन ज्या दिहा बैल न्यादो आले त्यावेळी मायो तायो जाम रड्ल्योत्यो.... नूसत्यो रड्ल्योस नात तॅ त्या दिहा जीवल्यो पन नाय. घरात दोन दि नूस्ता हताक जालता. कुनुस हारका जीवित-खावीत नॉता. नेहमीपरमाने जीवॉन कॅळा खाला गा त्या हाल्पाट बैलापूडॅ टाक्यादो गॉठॅत गॅल्यानंतर बैल विकिल्यात ई ध्यानात यासा आन मन रंजी हॉयॅसा.”

या जनवारांयी बॉड्यांनास आवड अहतॅ आहा नाय तर लान पनापासूनुस आपल्या मनात त्या बद्दल आकर्षन, प्रेम अहाते. एखादा लाना पोर खादो मन भरी नायदॅ नातॅ जाम रडॅ लागला गा त्याला गॉठॅत नीला जासा... “हांबाsss खायदॅ. हांबा ! तुला नाय द्यासा हा... शोनू खातॅ हा.” ई आहास हमखास बोयला जासा. बोयला जातॅ. बारके पोरे पन हांबाला बगॉनं खुश हॉयेशे.

अहॅ खूप कय अनुभव हात माय-तुमशॅ. कारन आपुन मुळशे शेतकरी. पन त्या काकाआ, त्या अॅका बॉलन्यानॅ एक भकास वास्तव मा नंदऱ्या समोर हाडला. “आतॅ ज्या घरात ये अहे गाय, भय, बैल दिखात्यात त्यायी देखभाल जुने माहनेस करत्यात. मा हारक्या तरुण पॉरांदरी ओडा खपॅदो वेळ नाय. पुडशा ५-१० वहरात आपल्या पोरांना गाय, भय, बैल आन खुळो मीनजॅ नक्की कुहनॉ प्राणी ई नुसता चित्र आन टीव्ही व्यतिरिक्त आपल्या अडे कडे बग्या मिळणार नाय.”

---

## “जागते रहो..... आमशा भरॉशॉर मत सोवो” - सचिन मेंडीस, बोळींज

दोन दिहाआदी गावात सोरीऑ प्रयत्न जाल्यामुळे गावात भीतीआ वातावरन जाल्ता. पोलिसायी एक दी गावात बंदोबस् ठोयलॉ पन बॉड्या सड्क्योर फिरॅसा होडला तॅ त्यां गावात फिरना कय जाला नाय. शेवटाला बाबुकाका हाथाखाला गावात रातसा फिरॅदो, अंद्र्या, दुमा, शॅजाव, मिंगू आन शिमा यां दोगा-शोगा गस्ती मंडळ तयार कॅला. रातसा ११ वासता गावशा खूर्सोर जमॅसा आन हाकोटसा ४ वाज्यापोत गावात फिरॅसा आहा ठरला. सॉरांना नीट फटाविता येदे आहा हत्यार राती येताना घिती या आहा बाबुकाकानॅ त्याआ सरदारांना हांगीला. राती ११ वासता बाबुकाका खूर्सोर पॉसलॉ. अजून कून आला नॉता. दा मिनटात जकले जमले.

“अंद्र्या तू का हत्यार हाडलॅ..? बाबुकाकानॅ अंद्र्याला विसारला.

“मॅsss मॅ कारव घॅऑन आलॅ.”

‘कारव...?’ ती त्या सॉरा xxxx घाल्याशी गा..? बाबुकाकानॅ रागाय अंद्र्याला हांगीला. ‘वॅडा कडसा.’ जाय बरॉ बांबू घॅऑन ये.

अंद्र्या गॅलॉ. बांबू कडसॉ हाडयासॉ ऑड्या राती... अंद्र्यानॅ लुसूआ बॅड्यावरसॉ बांबू खेशीलॉ... का हांग्यासा... हत्री काडी मोडली गा हत्री कही कोंगी हॉतॅ तही बॅड्याई गत जाली. अंद्र्या विजयी थाटात ८ फुटाऑ बांबू घॅऑन बाबुकाका दरी गॅलॉ. ‘वा.. वा.. ८ फुट लांबॉ बांबू... तूआ बयशा माडाय नाळ पाड्याशे हात गा..’ जाय शार-शार फुटाय दोन तुकडॅ करॉन हाड. अंद्र्या मुंडी हालवित गॅलॉ. आतॅ दुमायी पाळी, “दुमा तू का हाडलॅ रॅ हत्यार ?”, “मॅss मॅ... बरशी हाडले आन हाथातशी बरशी बाबूला दावडली. ती बरशी बगॉन बाबूआ डॉखा फिरला. ‘ईsss ई बरशी... तूआ बयशी..... आतॅ हांगातॅ रॅ... आरे यानॅ नांदेटी तरी मरदॅ गा रॅ... जाय याला थोडी धार लाऑन हाड. “शॅजाव तू का हाडलॅ रॅ..?” ”मॅ नाळ पाडॅसॉ दोर हाडलॅ” शॅजाव बोयलॉ... “आहा, सॉरांना कवळया नाळाव पानी पाजॅ वाटातॅ.” बाबूनॅ रागाय हांगीला. ‘नाय, नाय बाबू ! सॉरांना पकडॅ करता दोर हाडलॅ.’ “अच्छा मिंजॅ तू शेहेनशहा घतीन हाथात दोर घॅऑन रातसॉ सॉरांना पकड्या निंग्यासॉ.. मंग सोर रस्त्योर यॅऑन तुला हाक मारनार... शॅजाव.! शॅजाव.. मॅ आलॅ, माय हाथपाय बांद आन माला खॅचाटात ने.” सल साला, घारा जाऑन पारय नातॅ कुदळ घॅऑन ये..

“मिंगू तू कय हाडला नाय वाटातॅ ?” बाबूनॅ मिंगुला विसारला. तॅ मिंगूनॅ हाथाई मूठ उगड्लि आन ‘नेलकटर’ बार काडला.... ‘ओ बापा, ऑडा बॉड्डा हत्यार’... सोर सोरी कऱ्या याशे गा तू दरी हाथापायाये नाखे काड्या याशे रॅ.... आरे तू दरी कॉहॉ बॉड्डॉ हूरॉ पावतॉ.... आन पाठीला ता पाकीट कदो मारलॅ....बाबूनॅ विसारला. “नाय रॅ बाबू... बायकू हांगातॅ तुमे ५ तास फीरॅशे तॅ खादो ‘लेज आन मॅगी’ देते आन प्यादो ‘फ्रूटी’. ता जकला भरलॅ पाठीओरशा पाकीटात”. नशीब बायकूनॅ मांडूला आन दुधायी बाठली नाय दिली... जाय हूरॉ घॅऑन ये घरनॅ.” बाबूनॅ मिंगू पळविलॉ. ५ मीनटात जकले हथ्यारे बदलॉन आले.

“बाबू! तू आमाला ऑडॅ कायदॅ हांगाता, तॅ तू का हथ्यार हाडलॅ.” परत येता खोटी अंद्र्यानॅ बाबूला विसारला. बाबुकाका आहालॉ आन खिशातनॅ पिस्तूल काडला. ‘मेरे पास घोडा हाई, बच्चू.. यॅक गोळी निकली तो खेळ खलास.’ बाबुकाका पिस्तुलाआ नळीओर फुक मारीत बोयलॉ. ‘बाबू ! या घॉड्याला ऑलात कडसा घालता’ शॅजावनॅ एक पानसाट जोक कॅलॉ त्योर जकले आहाले. अंद्र्या बोयलॉ, ’बाबू इमळोरशा जत्र्या गॅला गा अहॉ फायदॉ हॉतॅ.’ हाहाहाहा. अही जक्लि चॅष्टा-मस्करी हॉता-हॉता १२ वाजलॅ. मंग जकल्या आहा ठरला की गावशा मांगनॅ जड्ने खाटान हाय तड्ने फेरी मारॅशी. तहे जकले तडे जादो निंगाले. गावातनॅ जाताना अंद्र्यानॅ बॉब दिली, ‘ जाssगते रहोsss आमशा भरोशे मत सोवो.’

**<u>जकल्या कुपारी बंद्वांना आन बेनींना नाताळशा हनायो शुभेच्छा</u>**

आपलॉस

# रोमन अंतोन फर्नांडिस

‘रोझ’, वेलंकनी माता देवळा मॅरॅ

फर्नातआळी

**<u>ॲनारा नवा वहरी तुमा जकल्यांना बरा जाओ</u>**

---

Merry Christmas & Happy New Year

# सारा & सारा टुर्स

1) निळ्याशार समुद्राची अंदमान निकोबार सहल : दि. २६ ते ३१ डिसें. १३
2) अफलातून गोवा सहल कोकण रेल्वेने :- १० ते १४ जाने. १४
3) खूप मौजमजेची हैद्राबाद-रामोजी-स्नोवर्ल्ड सहल : दि. २७ डिसें. ते १ जाने १४
4) बाळ येशूची तीर्थयात्रा नाशिक सहल : दि. ०८ व ०९ फेब्रु. २०१४
5) राजेशाही ग्रँड युरोप सहल : मे २०१४
6) एप्रिल २०१४ : ईस्टर सणानंतर व परीक्षा आटोपल्यावर अंदमान-निकोबार सहल
7) मे २०१४ : हायफ्लाय विमानाने काश्मिर सहल
8) मे २०१४ : आगळीवेगळी आग्रा, फत्तेपूर-सिक्री, दिल्ली, सिमला, कुलू मनाली, चंदीगड सहल

**संपर्क :**

**चार्लस डिमेलो - ९३७११९०३०३**

**विल्यम कोरिया - ०९०२८२८२०३५**

जाला पूडॅ सडक्याला गडप काळोख.. जवळसा पन नीट दिखात नॉता. ऑड्यात शिमानॅ हव्वयीनॅ गानॉ घॅटलॉ.... 'कभी कभी मेरे दिल मे खयाल आता है...' ता आयकॉन बाबुकाका तळपायायी आग मस्तकी गेली. 'तूआ आयसा xxxx मारला तॅरॅ.... काळ का, वॅळ का, तू क्या कामाकरता अडे आल्या या कय भान हाय गा....? तुला पूडसॉ ऑ काळोख दिखातॅ गा नाय...' ऑड्यात शिमानॅ गानॉ बदललॉ.. 'जीवनात माझ्या अंधार अंधार...' तहॅ बाबूनॅ शिमाय हाथ जोडलॅ आन त्या तॉड बंद कॅला. आतॅ जकले गावशा टॉकाला पोसले. कुत्रे बॉखॅसॉ आवाज येतॉतॉ. बाकी सामसुम. ऑड्यात अंद्र्यानॅ आवाज दिलॉ.. 'कून हाया रॅ तडे...' "हां हां अजून जॉरात हाक दे... तडनॅ सोर तुला उत्तर देदॅ. नाव, गाव पायदॅ तॅ रेशनकार्ड पन दाखडदॅ. कय अक्काल हाय, गा डॉख्याय खॉलॅ जाल्यात.. जरा शांत ऱ्या, सॉरा हालसालीऑ अंदाज घ्या..." बाबुकाका समजुतीनॅ बोयलॉ. पुना ॲकदा सामसुम. ऑड्यात शॅजावनॅ दगड टुकीलॉ आन आंब्या झाडाबुडा फेकीलॉ. जकले एकदम जाग्योर उडाले. 'मॅ... मॅ.. दगड टाकीलॉ..' शॅजाव बोयलॉ. "आतॅ तुला दगड मारॅदो का जाला..." बाबुकाकानॅ डॉख्याला हाथ लावीत विसारला. 'नाय ना बाबू... जॅ कून आंब्या झाडाखाला लपॉन बॅहॅलॅ हायदॅ तॅ दगड लागॉन डॉखा फूटॅदॅ... खेळ खलास... हाय गा नाय आयडिया.' शॅजाव बोयलॉ. बाबू डॉळॅ बॉट्टॅ करॉन शॅजावला बोयलॉ.. "भारी आयडिया हाय तुयी... तू दगड मारलॉ गा सोर त्यास खाला यॅवॉन ऊबी रॅनार आन डॉखा फॉडॉन घॅनार... एकदमूस भारी... नाळ फॉडॉन फॉडॉन तूआ डॉख्याव नाळ जालॅ... सल साळा नाळा खाकाट कडसा." ई बॉलना सालू असता मिंगूई नंदार शिशा झाडामांगॅ गेली, आन मिंगू ऑड्डालॉ... सोर.. सोर.. सोर.. आन यॅ जकलॅ शूरवीर गावा दिशेनॅ धावलॅ. दोन मीनटात आख्खॉ गाव जमलॉ. विरार-नाळाहॉपारनॅ पोलिस पन बोलवीलॅ. कुनाला कयीस पत्तॉ नाय नॅमकॅ सोर आल्यात कडे... बाबुकाकानॅ मिंगूआ तोंडोर बगीला आन विसारला, 'मिंगू, कडॅ बगीलॅ रॅ सोर..?' 'तडे शिशा झाडा मांगॅ एक सोर हॉतॉ.. हाथात दोन तलवारी... कय तरी हालसाल जानवाली... तॉ सोर आपल्योर बगीतॉतॉ.' मिंगूनॅ बॅत बॅत हांगीला. आख्खॉ गाव घाबरॉ-साबरॉ जालतॉ. दा मीनटात पोलिसाई गाडी आली. ३ पोलिस पूडॅ आन गावशॅ ५० गव माहने मांगॅ आहा जकला कटाम्बळा खाटानात गॅला. शिशा झाडाखाला आन मॅरॅदॅरॅ काळोख किट. लामनॅ कॅयतरी हालसाल जानवातोती. एक आकृती दिखातोती. २ डॉळॅ रॉख्खॉन... हाथात २ हूरॅ घॅऑन ऊबी होती. पोलिसाई लाईट सालू करॉन शिशा झाडोर मारली. "हम्यॅ... हम्यॅ..." एक बैल हांब्या लागलॉ. त्याए २ बोट्टे हिंगुटे नुसते तलवारीहारके हालतोते. बैलाला बगॉन पोलिस आन गावकरी जकले हाव्या लागले. ता बगॉन अंद्र्या हळुस बोयलॉ, "बाबू ! कॉडा पन हांग पन या गावठी बैला पूडॅ तूऑ 'घॉडॉ' कय कामाव नाय. आतॅ 'घॉडॉ' नॅऑन तूआ आंगळ्यात बांद." पुन्हा जकले हाव्या लागले.
ऑड्यात बाबुकाका ऑड्डालॉ, "ऑ बैल अडे कुनॅ हाडॉन बांदीलॅ ता माला पयला हांगा." तहे जकले गावकरी ॲकामॅका तोंडोर बग्या लागले. तहॉ शिशा झाडामांगॅ हालसाल बगॉन 'सोर सोर' करीत आख्खॉ गाव उठवनारॉ मिंगू फ्रूटी पेत पेत हळुस पूडॅ आलॉ आन बोयलॉ, 'बाबू ऑ बैल माऑस... काल हांसॉ अडॅ बांदीलतॉ... पन मॅस बाहालॉ....' हाहाहाहा.

## कुपारी हन

**- जयेश डिकोष्टा, लहानसरगोडी, गास**

प्रत्येक वस्तुआ मांगॅ एक इतिहास आहातॅ. आपली कादोडी भाषा, परंपरा, राहनीमान बग्या गॅला तॅ आपल्या संस्कृतीआ मांगॅ एक इतिहास हाय. अंदाजॅ पंदराशे - सॉळाशे काळात पोर्तुगीज मिशनऱ्याई आपल्या वसयमिंनॅ धर्मप्रसारला सुरवात केली आन आपल्यातसा खूपसा लोक ख्रिस्ती जाला. त्या टायमाला एकेका जॉड्प्याला आठ-दा पोरे अहॅशे. त्या पॉरा करता वायलॉ वायलॉ पदरीन घ्या लागॅसॉ. त्यापायान आख्ख्या गावशॅ गव माहने कुनाय ना कुनाय पदरीन जालॅ. पदरीनला तिगाळशा काळात कुपारी भगून हाक द्याशे. भगून जॉ तॉ ॲकमॅकांना कुपारी हाक माऱ्या लागलॉ. तातपासून आपल्या लॉकांना कुपारी आहा नाव पडला.

त्या काळात आपला लोक अशिक्षित हॉता, तरी ते मिशनरी लॉकाऑ त्याग, त्याई माया, मदत उमजातोते. तिगाळशा लॉकाई बायबल न वाशितापन मिशनरी लोकोर आन त्या शब्दोर विश्वास ठवीलॉ. 'प्रभू येशू ख्रिस्ता हिकवनुकीवर त्याई बॅताम श्रद्धा होती. आपल्या पूर्वजाई धर्मांतर कॅला तरी आपली आदीशी संस्कृती टिकवॉन ठव्याशी अही त्याई इच्छा होती त्यापायान आजपोत आपली संस्कृती टिकॉन रेली. आदीशा संस्कृतीतशॅ कायिक हन, आपलॅ खान्यापॅनॅय पदार्थ ताहास आपली आदीशी बोयली जाणारी भाषा त्याई टिकविली.

आपुन जर आपल्या अडशा डॉकऱ्या माहनांना विसारला तॅ ते जा का हांगात्यात त्योर विसार कॅलॉ तॅ आपल्या आहा ध्यानात येतॅ की संजावसॉ हन त्याकाळशा हनाहारकॉस हाय. जही होळी हनावेळी केळ पेटविली जाशी तहीस केळ संजावशा हनाला आपल्या अडे पेटवित्यात. हन लानॅ पन लॉकाव उत्साह खुब अहतॅ. अहॅ हन आत्या काळात कुणाला मायीती नात.

आपुन कायिक नवॅ हन सालू केल्यात तॅ बायबल तत्त्वोर. गुड फ्रायडे दिहा बनविल्यो जानाऱ्यो धाप्ट्यो या रोटीमीनॅ सुन (ताडी, विलांगरी) घालीत नाय कारन बायबलमीनॅ हांगीलॅ त्या दिहात खमीरपासून बनविलेली वस्तु खाशी नाय. ताहास हावळ्याव हन, नव्या पिकाला आशीर्वाद देनॅ अही परंपरा सालू जाले. त्यासबरबर सालू जालॉ नाताळसॉ हन. जॉ आज प्रत्येक बारक्या पॉरांपासून तॅ युवक आन बॉड्ड्याना उत्साह देनारॉ हन.

# कल्पतरू ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित, भुईगाव

## * *व्याजदर ०१ ऑक्टोबर २०१३ पासून* *

| कालावधी | सर्वसाधारण | ज्येष्ठ नागरीक |
|---|---|---|
| १८ ते २४ महीने | ९.७५ % | १० % |

## *कल्पतरू एकरकमी ठेव योजना (मर्यादित कालावधीसाठी)*

(मुदत १८ ते २४ महीने)

| | |
|---|---|
| **₹ २ लाख ते ५ लाख** | **१०.२५ %** |
| **₹ ५ लाखापेक्षा जास्त रक्कमेस** | **१०.३५ %** |
| **₹ १० लाखावरील रक्कमेस** | **१०.५० %** |

## * कल्पतरू आवर्त ठेव योजना *

(मुदत १२ ते ७४ महिने व्याजदर १० % ते १०.२५ %)

| रक्कम | कालावधी | रक्कम |
|---|---|---|
| ५००० ₹ | ७४ महिने | ₹ ५०३३२३/- |
| १०००० ₹ | ४२ महिने | ₹ ५०३८२८/- |
| १५००० ₹ | ३० महिने | ₹ ५१२५५५/- |
| २०००० ₹ | २३ महिने | ₹ ५००३९३/- |
| ३०००० ₹ | १६ महिने | ₹ ५११२७३/- |
| ४०००० ₹ | १२ महिने | ₹ ५०७१५२/- |

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | मा. सचिव |
|---|---|---|
| श्री. मॅकेन्झी डाबरे | श्री. निलेश डाबरे | श्री. रॉबर्ट पिरेल |

**व**

**संचालक मंडळ**

आपुन विसार करॅ पाय की अगोदरशे कुपारी नाताळसॉ हन कहॉ साजरॉ करतोते. ‘गॉठ्याकरता खुटे उबी करॅशे त्योर गाडयाई हाटी ठॉॲशी. मॅरनॅ हावळ्यो बांदयाशो. खाजुरी नातॅ भेरळी पातॅ आन बी कयतरी घरशेस सादने वापरॉन गॉठॉ हजव्यासॉ. फुले आन हार लाऑन त्याई सॉबा वाडव्याशी. तिगाळशा काळात लाइट नोती भगून तॅलपान्याऑ दिऑ लाव्यासॉ. गावात एकुस गॉठॉ अहलॅनॅ जकले एकत्र ॲवॉन प्रेमाय गॉठॉ बनव्याशे. तिगाळशा काळात गॉठॅ पूरॅपुर नैसर्गिक अहॅशॅ. जकला समान घरातसास. विकत कय आढीत नोते.

आज जॉ गॉठॉ बनविलॉ जातॅ तॉ जुन्या पद्धतीनॅस पन त्या सामान गॉळा कऱ्याकरता आख्ख्या गावात शार-शार दा फिरॅ लागातॅ तिगाळा कडे थॉडाथॉडका सामान मिळातॅ. कारन जुन्या परंपरा बरबर सामानपन जुन्या काळात गॅला. जरी कायिक रीती गेल्यो तरी नाताळसॉ गॉठॉ बनविताना आजशॅ तरुन आपल्या जुन्या संस्कृतीआ आन परंपरा या दर्शन आपल्याला दाखडॅसॉ प्रयत्न करत्यात. जरी तरुनाई जुना राहनिमान आन पॉशाख होडलॉ तरी त्याबद्दल आन आपल्या संस्कृतीऑ त्यां मनात आदर हाय.

आपुन जकल्याई एक गोष्ट लक्षात घ्या पाय की आपली “कुपारी संस्कृती” आपल्याला आपल्या वाडवडलाई दिलेली जबाबदारी हाय. ती जबाबदारी पुरी करॅशी ई आपला कर्तव्य हाय भगून त्या संस्कृतीऑ आदर करॉन ती टिकव्याशा उद्देशानॅ आपुन वागला पाय.

---

## डाबऱ्यांई शान, वसयसॉ मान, जकल्याव अभिमान - नितिन डाबरे, माळीआळी, निर्मळ

का हांगॉ तुमाला आमशी कानी. ई जकला दॅवा वरदान. इंबळोरनॅ अर्नाळा बस निंगाली गा पयल्या स्टॉपला जकल्यायो नजरो उजव्या हाताला वळात्यात. कदो ? डाबऱ्यांआ असना बॉड्डा घर बग्यादो. घर पन का हांग्यासा नुसतॉ राजवाडॉस. त्यायी सॉबा कय वायलीस होती. यी आहा घर बांदयादो आमशा वाडवडलाई ओबड्यो खस्तो पन खाल्यात हां..!

तुमाला हांगातॅ, डाबऱ्या कुटुंब वाडला ताहा नवा घर बांदयादो नव्या जाग्यायी सोय कऱ्या लागली. माळ्याआळीतसॉ शेट, शॅजाव माळी जागा द्यादो तयार जालॉ. आन डाबऱ्याव कारभारी आमसॉ पनजोबा “हानु डाबरे” पुडॅ आलॉ आन घरायी पायाभरनी केली.



ई घटना १९३० शा काळातशी हाय. हानु डाबरे याय स पॉर करतॅ-करवीतॅ. जकले एकत्र आलॅ आन थॉडा थॉडा करता घर बांदया सुरवात केली. का हांगॉ तुमाला, गाडयातनॅ जंगलातसा लाकूड हाडला. मेडी उबी केल्यो. पायरीआॅ दगड घडवीलॅ. बगीता बगीता बॉड्डा घर उबी रॅला. असनॉ ऑटॉ. ऑटॉ मीनजॅ जहनी खॅळा मैदानूस. स पॉरांदो स बॉड्डॅ वर्ग. लांब लसक ओहरी. बगता बगता कुटूम वाडात गॅला. ॲकाय शार, शाराय आठ आन मंग दिडेकशे माहनाआॅ परिवार जालॉ. कून हॅतात खपलॉ. कून दूध घिती गॅलॉ. कुनॅ मालायी कावड वाईली तॅ कुनॅ मुंबय माल नीलॉ. कायिक हीकॉन कामाला लागलॅ तॅ कायिक मास्तर जालॅ.

या घरायो पायऱ्यो त्यायी उंच्छी याविषयी का हांग्यासा. पायऱ्योरनॅ सडताना आहा वाटॅसा जहनी स्टेजवरुस सड्या लागलॅ. ओट्योर शार हिंदाळॅ. त्यात बॅहलेल्या हऱ्यासमोर भाटाकुटातनॅ नातॅ मायारनॅ ऑबाय आल्यो गा, पायऱ्यो सड्यादो पाय काप्याशॅ. पन त्यास पायऱ्योरनॅ बायीयोरशा पान्याओ दुटीवर दुटी सड्विल्यात. आमशा घरसा एकपन लाना पॉर आहा नाय की जा त्या उश्शा आन बॉड्ड्या ओट्योरनॅ खाला आंगळ्यात पडला नाय. दॅवा वरदान आन घरा वैशिष्ट्य की जरासा खरसाटन्या व्यतिरिक्त बी बोड्डी इजा कतॅ कुनाला जाली नाय. रॉज हांशापारा आमशा घरशा ओट्योर रोजरी तेस हॉॲसा. कुस्तीन मास्तर आमसॉ काका जकल्यांना एकत्र करॅसॉ. आमा पॉरांना तहॉ कंटाळॉस यासॉ पन इलाज नॉतॉ. तेसाला हजर रेले नाय गा दुहऱ्या दिहा शाळीत हजेरी हॉयाशी. कारन कुस्तीन मास्तर आमशा शाळीत हेडमास्तर हॉतॉ. भगूनुस आमाला प्रार्थनेयी आन शिस्तीयी हव्वय लागली.

आमशा घरामीनॅ, कुस्तीन मास्तरशी पोरी, मीनजॅ आमशी ताई पयली शीश्टर हॉया गेली. तीआ मांगोमांग आमशी रोजीन बाय पन शीश्टर हॉव्यादो गेली. दोग्यो बेनी फातिमा माता मीनॅ शीश्टर जाल्यो. (आज रोजीन बाय आमा जक्ल्यांना हॉडॉन एकदम लान्या वयात दॅवा राज्यात गेले. देव तीआ आत्म्याला शांती देओ.) आमशा वाडवडलाइ पुण्याई भगून आमशा घराई आध्यात्मिक वाढ हॉतुस गेली. दोन बेन्या मांगॅ शार बाहा फादर जालॅ. फा. डॉमनिक जकल्यात पयलॉ, त्या मागोमाग फा. राजेश आन फा. प्रदीप ॲ आपल्या वसय धर्मप्रांताकरता काम करत्यात. तॅ आतॅ अलिकडेस फा. रूपेश ऑ अमरावती हारक्या मिशन धर्मप्रांताकरता काम कऱ्या तयार जालॉ. दॅवाई कुरपा अहीस आमशा घरोर रेली तॅ अजून फादर शीश्टर हॉयद्यात. आमसा बॉड्डा घर वाडात गॅला. पोरे, डोकरे होकरे... कटांबळा वाडातुस गॅला. दिडेकशे माहना कुटूम जाला. जागा कमी पड्या लागली. वायले वायले घरे बांदयादो सुरवात जाली. १९९२ ला पयला कुटूम बायर पडला. मंग अस्तॅ अस्तॅ एक एक जन बायार पड्या लागलॅ. मोजकेस शार - स कुटुंबे असन्या बॉड्ड्या घरात रेले. मंग त्याई सुद्धा विसार कॅलॉ आन काळाई गरज ऑळखॉन शेवटी घर मॉडॅसॉ विसार पूडॅ आलॉ. काळजोर दगड ठवीलॉ... डॉळ्यातशे आहु तहॅस हुकलॅ.... ज्या घरात लान्याय बोड्डे जाले, खेळले - माळले जतीमतीला रेले ता घर मॉडताना बरास दुख जाला.

# जीवन विकास नागरी सहकारी पतपेढी (मर्यादित), वाघोली.

रजि.नं.टीएनए /व्हीएस्आय /आरएस्आर / सीआर / ४२९/८८-८९ दिनांक ९-१२-१९८८

*१९८८ - रौप्य महोत्सवी पतपेढी - २०१३*

| आपल्या व्यावसायीक व कौटुंबिक विकास योजनेसाठी पतपेढीच्या सेवा |
|---|

## *१२ महिन्यापेक्षा जास्त ते ३७ महिन्यापर्यंत*

## जेष्ठ नागरीकांच्या ठेवीवर

द.सा.द.शे. ९.८५ % व्याजदर

**सर्वसाधारण सभासदांस द.सा.द.शे. ९.६०% व्याजदर**

११% ते १४ % व्याजदराच्या विविध सुलभ कर्ज योजना.

**३१ ऑक्टोबर २०१३ अखेर आर्थिक प्रगतीचे बोलके आकडे**

* भागभांडवल रू. ५.६९ कोटी
* कर्जे रू. ६२.५२ कोटी
* ठेवी रू. १०९.१० कोटी
* गुंतवणूक रू. ५६.९० कोटी
* एकूण व्यवसाय रू. १७२ कोटी
* सभासद संख्या ९५५५
* ढोबळ एन. पी. ए. ०.३१ %
* दि. ३१/०३/१३ अखेर ढोबळ नफा रू. २.२१ कोटी

विश्वासाचे व सौजन्यपूर्ण सेवेचे प्रतिक म्हणजे

# जीवन विकास नागरी सहकारी पतपेढी

- शाखा -

| निर्मळ | सत्पाळा | उमराळे | नानभाट |
|---|---|---|---|
| फोन :२४७०५५२/५५३ | फोन : २५८५१७० | फोन : २४११०१२ | फोन :२५५१५५१ |

| ग्रेगरी एम्. दोडती | रॉक जी. रॉड्रीग्ज | सिल्वेस्टर ए. दोडती |
|---|---|---|
| मुख्य कार्यकारी अधिकारी | उपाध्यक्ष | अध्यक्ष |

व

- संचालक मंडळ -

वयाशा ६५व्या वहरी मिंजंस २००० साली आमसा घर मॉडॅदो घॅठला. मेडी जोडयो उब्यो होत्यो तोड्योस जमिनीखाला गाड्लेल्यो होत्यो. जहनी RCC काम कॅल्या हारका. तॅ नक्षीकाम कॅलॅलॅ दरवाजॅ. ते पितळीए कडे, तॅ पाटॅ, त्यो उखळी, ते जाते... जकला आतॅ आठवनीत गॅला. आज जरी जकल्याये वायले वायले घरे जाले तरी सुखादुखाला जकले जमात्यात. लग्नाला तॅ कय बॉल्यास नाका. पयल्यापासून आमसा घर मिंजॅ आख्खॉ गाव. मरनापासून लग्नाला, आवजीपासून लानीपोत जकल्या कामाला आमसा आख्खा घर आला तरी बास जाला.

आतॅ नवीन पिढी आली. हिकल्यो सवरलेल्यो कामाला जानाऱ्यो ऑबाय आल्यो. पन घराई आध्यात्मिकता कय कमी जाली नाय. दॅवळा कामात जकलेस पूडॅ अहत्यात. त्या जकल्याई मीळॉन हाऊ-ओसा एक बॅंकेत खाता पन खोललॅ. या बॉड्या घरशी एकत्र रॅशी रीत त्याई कुहन्यान कुहन्यापरकारॅ सालू ठविले ऑस या बॉड्या घराव अभिमान. ई घर दिहोन दी आहास बॉड्डा हॉवॉत जाओ... ई या बाळ येशू दरी प्रार्थना.

---

## कोंबडी पळाली

- सिरील मिनेजिस, आगाशी

आयला! पयला ताता गा पयली कोंबडी? या प्रश्नाआ उत्तर अजून आपल्याला हापड्ला नाय. पन यास तात्या आन कोंबडीओ (दोनू गावठी हां) आपल्या कुपारी माहनाऑ घनॉ जवळसॉ संबंध हाय. आतॅ इस बगा ना, आपलॉ कुपारी समाज जेमतेमुस हॉतॉ. तिगाळा मीनजॅ साठ-सत्तरशा दशकात (एकोनिसशे हां) हाळांबॉ नहलॅला घर हापड्यासास नाय. मिंगारा गॉठॉ आन पाड्गईत हाळांबॉ ई शित्र जडॅतडॅ दिख्यासा. निदान एक गाय नातॅ भय लॉकां दावनीला बांदलेली अहॅशी. एकत्र कुटूमपद्धत अहल्या पायान प्रत्येक घरात माहने पन जाम अहॅशे. मीनजॅ त्या टायमाला माहने जास्ती आन घरे कमी होते. आतॅ जालॅ नॅमका उलटा. घरे जास्ती जाल्यात पन माहने जाल्यात कमी. तॅ काईक ठिकानी घर हाय पन रॅदो माहनेस नात. तिगाळशा टायमाला लोक शेतीवाडी बरबर गुरेढोरे आन कोंबडीपालन ऑ जोडधंदॉ करॅशे. मंग का ? प्रत्येका हाळांब्यात शार पास कोंबड्यो अह्याशो. हाकोट जाली गा हाळांब्योरसा डाखान टूकॅसा गा कोंबड्यो हुरान मारॉन पळॅशो. यायो कोंबड्यो त्या ओट्योर आन त्या घरशो कोंबड्यो या ओट्योर अॅऑन आजारॅशो. (फिट्टम फाट) गावात कोंबड्योस कोंबड्यो दिख्या लागल्यो गा समजॅसा हाकोट जाली. पॅंड्या राहीओर खॉरनारयो कोंबड्यो पॅंड्यातनॅ नॅमकॉ भाताव दानॉ कॉहॉ शोदीत्यात या उत्तर माआ हरी तुमाला पन अजून मिळाल नायदॅ. ऑडास नाय, मातीत टॉकॉ मारीत फिरनारी कोंबडी मातीतनॅ का टूकॉन खातॅ हाय दॅ? ता तीआ तिलास माईत. आमसॉ लोपीस मास्तर हांगॅसॉ, कबुतर हॉना पसवितॅ आन कोंबडी दगड. ता कय खॉटा नाय. आमशी डोकरी हांगॅशी कोंबडीआ मटन कमी खा गराम पडदॅ. (थंडा करॉन खाला तरी गराम पडातॅ हां.)

आत्याशा हारके कोंबडीआ मटनाए दुकाने (चिकन शॉप) त्या टायमाला नोते. अॅखादॉ हन आलॉ गा आमशी बय मोरलीओर भॅशी. मंग अॅखादी मांदाटलेली कोंबडी नायतॅ हाळांब्यात न बॅहता हॅगटा झाडोर बॅहॅनारॉ कोंबडॉ यापैकी कुनाय तरी दी भरलॅ आहा समजॅसा. गावठी ताते जवळ जवळ जकल्या घारा अहॅशे. मंग अॅखादॉ जॉबायकाका (तात्याव व्यापारी) यासॉ आन हाळी द्यासॉ, 'ताती द्या ताती, जॉबायशा हाती नायतॅ कोंबडी मेली राती.' आन मिंगॅ यॉ जॉबायकाका शाराण्या ताता दा-पंद्रा पैशाला घॅऑन जासॉ. गावठी ताता बोयल्योर जकल्या तॉडाला पानी हुटलॉस पाय. अह्या या गावठी तात्या जकल्यात जवळसा नाता कुना हाय दॅ तॅ, ता मदरीन-पदरीन सा. मदरीन पदरीनला घरात खिरताना बगीला गा हाळांब्यातशे ताते भरभर कापॅशे. बाफलॅला ताता नातॅ तात्याऑ पॉळॉ मदरीन-पदरीनशा पूडॅ ठोयल्याबिगर त्याऑ मानपान पूरॉस हॉयॅसॉ नाय. ताहास नव्या जावायसा हॉअॅसा. जावाय आलॉ गा मिंगारशो कोंबड्यो लांब पळॅशो. गावठी कोंबडी कापीली आन सुलीओर टाकीली गा त्या वासाय आजूबाजूशा घरात चर्चा हॉअॅशी, "जावाय आलॅ वाटातॅ."

प्रत्येक घरात एक अही कोंबडी पन अहॅशी, जी ताते घाल्याशा रंगात आली गा एकदम गायब हॉअॅशी. कोंबडी दीखॅशी रेली गा मालकीन, 'कोंबडी कुनॅ तरी सॉरॉन खाली' आहा बॉलॉन गाळी दॅऑन मोकळी हॉअॅशी. आन मयन्या-दीड मयन्यान ती घालवालेली कोंबडी आठ-दा पिलोटे घॅऑन घारा याशी. मालकीन खुश. कोंबडीअॅ प्रकार तरी कॉडॅ. सादी कोंबडी, गळमुंडी कोंबडी, उलट्या पाखाई कोंबडी. ऑ कोंबडीऑ धंदॉ मिंजॅ बायकाई बारोजी. त्या निमित्तानॅ तीआ कनवटीला शार पैशॅ जमा हॉअॅशॅ.

हळूहळू काळ बदाललॉ "कोंबडीनॅ ताता घायला आन बाळा दुदाला गॅला" आहॉ गानॉ बॉलनारी बय गेली आन "कोंबडी पळाली ती पन तंगडी धरून" अही गत जाली. समाज पुडारलॉ. कुडाय घरे गेले. हॅनाय हारवीलॅलॅ ऑटॅ मारबलशा लादीखाला गडाप जालॅ. त्या काळात अॅका ओहरीत दा-बारा माहना कटांबळा रॅनारा घर गॅला आन तीन-शार माहनाकरता रॅदॉ दोन मजली शिमिटाआ पक्का घर आला. मिंगारसॉ गॉठॉ गॉठलॉ. तीसगत हाळांब्याई जाली. कोंबडी पळाली. नाय नाय पळविली. मदरीन-पदरीनशा नशिबी इंग्लिश कोंबडीआ तात्याओ पॉळॉ आलॉ. तिस गत नव्या जावायशी जाली. बॉयलर कोंबडी त्या नशिबी आली.

आतॅ ई जकला कोंबडी पुरान हांगॅसा कारन का? तॅ ई पळालेली कोंबडी परत आले. समाज सुधारलॉ. जुने घरे गेले. बॉड्ये बॉड्ये बंगलॅ जालॅ आन तुमाला का हांगॉ या बंगल्या मांगॅ हाळांबॉ नहलॉ तरी बारकॉसॉ पिंजरॉ (खुराडॉ) आलॉ. आदी धंदॉ बगुन कोंबडीओर बगनारॉ कुपारी आतॅ शौक (छंद) बगुन कोंबडीओर बग्या लागलॅ. शौकीन माहने मांडवीआ बजाराला भॅट द्या लागले. एकून का ? तर ई कोंबड्यो पाळॅसा फॅड परत आलॅ. शेवटी का, "तॅ कोंबडी कोडी पन पळाली तरी आपल्या हाळांब्यात बॅहॅदो याशिस."

# येशू ख्रिस्त परत जन्मा आलॉ - ख्रिस्तोफर रिबेलो, सॉकाळा

"दादय, परवादीपासून आगमनकाळ सालू झालॅ, माला या वहारा गेलास पायआ." आपलॉ येशू ख्रिस्त स्वर्गात निशिताइ बॅहलॅलॉ असताना मरिया मावलीला बोयलॉ.

'यॉ आहा का बॉलातॅ हायदॅ' मावली विसारात पडली, "पॉरा, करॅ, का जाला?, तू मनात अचानक ऑहॉ क विसार आलॉ" मरिया येशूला बोयली.

"दादय, माला जाम कंटाळॉ आलॅ, दर वहारा मॅ जातॅ खरॉ पन आलॉ गा माइ कही हालत हॉवातॅ बगिलॅ ना" येशू बोयलॉ. "नाय रॅ, पॉरा, आपल्याला लॉकांकरता गॅलास पाय." मावलीनॅ त्याइ समजूत काढली. विसार करीत असतानास येशू ख्रिस्ताआ जन्माकरता तीनॅ गॅब्रीयल देवदूताला हा हांगिल्यापासूनसा जकला तिला आठवाला.

जोकीम, हन्ना आन त्याइ एकलीशॅ एकली पोरी, मरिया, नाझरेथ गावसा एक खुब धार्मिक कुटुंब..... त्या दिहा दोपारशॅ बारा वाजलोतॅ, तीनॅ दादयला स्वयपाक कऱ्या मदत केली, बाबा बजारा गॅलतॉ तॉ यासॉ हॉतॉ. 'मॅ खोलीत जावॉन प्रार्थना करतॅ, बाबा आलॉ गा हांग मंजॅ आपुन एकत्र जिवॉ' आहा हन्नाला हांगॉन ती खोलीत आली, तीनॅ नेहमीप्रमानॅ प्रार्थना कऱ्या सुरुवात करॅ... ऑड्यात खोलीत जाम उजेड झालॉ आन तिला आवाज आलॉ "ए कुरपॅन भरलेली बाय, तूआ भला होवो, देव तू बरबर हाय." ती घाबारली, तीनॅ समोर बगीला तॅ एक देवदूत ती पुडॅ ऊबी हॉतॉ. गॅब्रीयल देवदूत तिला बोयलॉ "मरिया, घाबरॉ नाका, देवाशी तूओर कृपा झाले, पवित्र आत्मॉ तुओर येदॅ आन तुला दी होयॅद्यात, तुला पॉर होयॅदॅ, त्याआ नाव येशू ठव, तॉ खुब भॉठॉ राजॉ हॉनार आन त्या राज्य कत्तॅस खप्प्यासा नाय" मरिया बोयली "मॅ देवाशी दाशी, तू हांगाता ताहा होवो"

मरियेनॅ हा तॅ हांगीला पन तीआ योसेफबरबर होयरा झालता, तीनॅ त्याला इ बातमी हांगिली, तॉ कइस बोयलॉ नाय, साफ भॉळॉ माहनू हॉतॉ तॉ.. त्यानॅ विसार कॅलॉ, उगास मरियेशी बदनामी नाका, मॅ तीआ बरबरसा होयरा होडतॅ.. पन मग देवदूतानॅ स्वप्नात येवॉन त्याला वस्तुस्थिती हांगिली ताहा त्यानॅ मरियेबरबर लगीन कॅला..

मरियेसॉ नववॉ मयनॉ सालू झालतॉ आन त्यात कैसर राजानॅ जनगनना कऱ्याशी ऑहॉ हुकूम होडलॉ.. योसेफ मरियेला घॅवॉन त्याव मूळ गाव बेथलेहेमला गॅलॉ. तडॅ त्यांना अजिबात कडॅ जागा मिळाली नाय आन अडॅ मरियेला त्रास सुरू झालतॉ... खुब जना दरी हातापायापडनी केली, पन त्यांना जागा कय मिळाली नाय. शेवटी एका गायश्या गोठ्या गवानीत गवताआ आथुनोर तीनॅ येशूला जन्म दिलॉ.. देवदुताइ त्या जन्माइ बातमी मेंढयो सारनाऱ्यांना दिली, तॅ आलॅ, आकाशात एक नविन तारॉ परगाट झालॉ, त्याव माग काढीत तीन राजॅ आलॅ, लान्या येशूला बगॉन गॅलॅ..

"दादय, का झाला, विसार काय करता?" येशूनॅ ती मॅरॅ बॅहात तिला विसारला.. मरिया भानोर आली.. "कय नाय रॅ, पॉरा, अहास, तू जाशी तयारी कर आन जास्ती मनाला लावॉन घॅव नाका कय"' मरिया येशूला बोयली...

येशू त्याआ खोलीत आलॉ, पलंगोर बॅहात तॉ विसार कऱ्या लागलॉ....

'मॅ परत पृथ्वीओर जन्मा जासॉ कादो, मा मनाहारका कय तरी सालू हाय गा?, ज्या बेथलेहेम गावात मॅ जन्माला आलतॉ तडॅ आज का भयानक परिस्थिती हाय, मास घरा माला कुन विसरी नाय... कितीतरी लोक सामूहिक हत्याकांड आन अणुबॉम्बमुळॅ मा हारका सुळोर सढविलॅ.. मॅ देवासॉ पॉर पन माहनू मनून जन्म घॅतलॉ, क, तॅ माहनाआ सुख-दुख का हाय त्याव अनुभव आलॉ पाय भगून.. आन देव बाप्पाला हांगीला, माइ नाय तुइ इच्छा पूर्न होवो.. आज हो लागलॉ का माहनू पानी कमी पन बीयर घनी पॅतॅ. बाप जिन्याखाला खाट्योर खॉकॉन खॉकॉन हाडाव पिंजरो झालॅ, आन पॉराआ हॉलमिनॅ मांस-मटन हॉळातॅ-पॅरातॅ. गाडी, बंगलॉ, जकल्यो सुखसोयी, पैशाआ माज सॉकावलॅ, सल्दॅ, पन दादयनॅ हांगिलॅ ना मग जाना भाग हाय, काना गावात तिआ पावन्यामीनॅ लगीन होता तिगाळा द्राक्षारस कऱ्या माइ वेळ याशी होती तरी नाय हांगीला नाय. आतॅ दादय हांगातॅ ताहा लोकाआ श्रद्धेऑ प्रश्न हाय. माला जाना भाग हाय.."

येशू मग जाश्या तयारीला लागलॉ, ओड्या लोकाइ श्रद्धा हांबळ्याशी मन्जॅ खासा काम नाय, तॉ देवबाप्पादरी गॅलॉ, त्यानॅ नेहमीप्रमानॅ मागनी केली, "बाप्पा, मॅ पृथ्वीओर साललॉ, माला काइक वस्तु पात"

देवबाप्पा हांगातॅ, "सल तुला का पाय ता घॅ सल, ये मा बरबर". ती एक खुब भोठी खोली होती. त्यामिनॅ वॅगवॅगळॅ कप्पॅ हॉतॅ, पयल्या कप्पॉ हॉतॉ, आशीर्वाद. देव बोयलॉ कॉडॅ पात, आठ-दहा दी पुरद्यात ऑडॅ गा.. अहॅ यातनॅ रॉजूस दॅना सालू हाय पन तू तूऑ जन्म साजरॉ कऱ्या साललॉ गनाय, तुला कॉडॅ पात तॉडॅ घॅ.. येशूनॅ डॉळॅ बंद कॅलॅ, प्रार्थना बोयली, आन त्यामिनशॅ काइक आशीर्वाद त्या झोळीत जमा झालॅ.. पुढश्या कप्प्यात येशूनॅ नजार टाकीली ताहा त्याला हावा आला, त्या कप्प्यात "संपत्ती"ऑ स्टॉक हॉतॉ. देव बोयलॉ करॅ हावाता कादो, माला माइती हाय, तुला आख्खॉशे आख्खॉ स्टॉक घॅवॉन जा लागॅ. पुढश्या कप्प्यापा आलॅ त्यात यश आन मान हॉतॉ, येशू बोयलॉ, यॉ पन जॉडॉ न्यासॉ तॉडॉ कमीस.. ज्या दरी हाय त्यांना अजून बी पाय..

पुढश्या कप्प्यापा आलॅ तॅ दोगॅ, दॉगाआ चेहऱ्योरसा हावा गॅला, तॉ कप्पॉ "सुबुद्धी"सॉ हॉतॉ, त्या कप्प्यात ओबडी धूळ, हुतॅरॉ जमलोतॉ, खुब दी त्या मॅरॅ कुन आला नॉता आहा दिखातोता.. देव बोयलॉ, या मिनसा कय नेव नाका, उगास तुला

वजान, जाहातशॅ ताहा तू परत हाडॅ, तडॅ कुनॅ इ मांग्या नाय, पन येशू बोयलॉ, नाका बाप्पा, थॉडॉ स्टॉक नॅतॅ, एक जरी कुन भेटलॉ तरी बास...

देव येशूला पुढे घिती जाताना बोयलॉ इ सगळा लोक जिगाळा मागॅदॅ तिगाळा तुला द्या लागॅ पन पुढश्या कप्प्याश्यो काइक वस्तूपन घिती जाय आन खाला अह्योस वाट, तडनॅ मग येशूनॅ प्रार्थना, शांती, सत्कृत्य, परोपकार, त्याग, श्रद्धा, प्रेम, सत्य, सेवा, अहिंसा, संस्कार, पावित्र्य, लाज, पश्चाताप इ सगळा त्या झोळीत घेतला. तॉ देवाला बोयलॉ, गेल्या वहारा मॅ जात असताना माला रस्त्यामीनॅ सैतान भेटलोतॉ, तॉ माला बोयल्तॉ की तू कॉडाही बरा घॅवॉन जाय मॅ अगोदरूस काम, क्रोध, लोभ, मद, मोह आन मत्सर यॅ षड्रिपू माहना मनात होडल्यात. त्याबरबर संशय, समस्या, संघर्ष, क्रूरपणा, तिरस्कार ये पन हात." पन बाप्पा, नाय जगात जकल्यापोत तो कय पोश्यासॉ नाय, देवबाप्पास हाय जॉ जकल्या ठिकानी हाय, आन जडॅ बाप हाय तडॅ पॉरानॅ घाबऱ्यासा कादो.. तडॅ कोकरू आन लांडगो एकत्र फिरात्यात, वाहरू, सिंह एकत्र रॅत्यात, गाय अन अस्वल एकत्र सरात्यात, सिंह बैलाव पेंडॉ खातॅ, माला यंदा जादो जाम कंटाळॉ आलतॉ पन दादय आन बाप्पा, तुमशॅ आशीर्वाद बरबर असताना मा काम मॅ चोख करनार अहॉ माला विश्वास हाय.

आन मॅ या वहरी वसयला जास्ती लक्ष दॅ.. तडॅ माला खुब बरा वाटाते, तडॅ काइक लोक खुब चांगलॅ पन हात, तॅ माई खुब वाट बगीत आहात्यात. आन नुसती बारनॅ नाय तर त्या हृदयात पन माला जागा हाय. आन विशेष मंजॅ उडदा पिठाये सालने, बेसनशॅ लाडू, डुकराआ इंदॅल, करज्यो, फुगॅ, तळनायो रोटयो खासा जाम मन आलॅ. त्याआ बरोबर लान्या पोरांहरी कुका-कुक खॅळ्यासा पन हाय.

येशू ख्रिस्तानॅ झोळी तुकिली आन तॉ पृथ्वीओर यादो निघालॉ..

---

**अभिनंदन**



एनडीए प्रशिक्षनामिनॅ आख्ख्या भारताश्या ४ लाखपैकी निवडलेल्या ४४९ पोरांमिनॅ २२०वॉ आलॅलॉ ***पयलॉ कुपारी* मॉल्कम डायस (भुईगाव)** याआ अभिनंदन आन पुढश्या अभ्यासाकरता ओबड्यो शुभेच्छा.

## अंकाकरता देनगी

अनामिक - ५००० ₹

स्व. बावतीस दोडती स्मरणार्थ देणार उषा दोडती - २००० ₹

वॉल्टर तुस्कानो, मेदोडी - १००० ₹

नरेश लोबो - १००० ₹

शांतीयागो डिमोन्टी, मेढे, ५०० ₹

स्वागत रिसॉर्ट - ५०० ₹

आनंद परेरा, वंडा - ५०० ₹

अवेलीन कोरिया - ५०० ₹

सिझर गोन्सालवीस, सोमाडी, आगाशी - ५०० ₹

अनामिका - ५०० ₹

योगिता जेम्स, दुबई - ५०० ₹

स्नेहल सॅमुएल आल्मेडा, हिडी-नानभाट - १०० ₹

जॉन गोम्स, गोम्सआळी - १०० ₹

लॉईड गोम्स, गोम्सआळी - १०० ₹

रॉबिन गोम्स, गोम्सआळी - १०० ₹

किरण गोम्स, गोम्सआळी - १०० ₹

रॅली रॉड्रिग्ज, गोम्सआळी - १०० ₹

रॉनल्ड गोम्स, गोम्सआळी - १०० ₹

अमोल डिसोजा, गोम्सआळी - १०० ₹

विजय गोम्स, गोम्सआळी - १०० ₹

रेक्सन वाझ, गोम्सआळी - १०० ₹

विल्मा गोम्स, गोम्सआळी - १०० ₹

## स्वेच्छा मूल्यानॅ जमा झालॅलॅ पैशॅ

गॉहाळी - १००० ₹

गास - १००० ₹

नांदान - १०० ₹

उंगनभाट - १५० ₹

भाटी - ५० ₹

अंद्रूसर (बावखाल) - १०० ₹

मिल्टन रिबेलो (शिसोडी) - १०० ₹

दारसेंग - १५० ₹

सॉकाळा - २६० ₹

दोनतलाव - ३७० ₹

हांबोडी पूर्व,आगाशी - २०० ₹

निर्मळ - २६० ₹

मांडलय - १२० ₹

पोंडा - ११० ₹

वाघेश्वरी - ६० ₹

**जकल्या कुपारी ब्ंदवांना आन बेनींना नाताळशा हनायो आन नव्या वहरायो शुभेच्छा**

ADVOCATE

गीता विल्यम फर्नांडिस

मोबाइल - ८६९८११८२९१

९०९६०२८३६८

fernandesgeeta@ymail.com

विल्यम अ. फर्नांडिस

मोबाइल - ९५५२२६२९४१

९८९०२९७३००

fernandeswilliam70@ymail.com

**वकील, वसय कोर्ट**

---

ऑफिस - २, खालसॉ मजलॉ, रूपा अपार्टमेंट, पाटील इस्पितळा मॅरॅ,
नाळाहॉपारा (प) - ४०१२०३

**जकल्या कुपारी ब्ंदवांना आन बेनींना**
**नाताळशा हनायो शुभेच्छा**

कुमारी आयरीन सायमन कोरिया

कोलभाग, नंदाखाल



माआ कुपारी मित्रांनो आन् बाहा बेन्यांनो

''हाऊ ओसा तळा'' बगीला, एकदा ''पटाळ्या तळा'' बगॉन घ्या.

# अथर्व आयुर्वेदिक पंचकर्म केंद्र

अथर्व मेडिकल फाउंडेशन, मुंबई संचालित

पटाळ्या तळा, उंबरगोठन, नवापूर रस्तॉ, पोस्ट - आगाशी, विरार (प.)

- आयुर्वेदिक उपचाराऑ फायदॉ सावकाश पन हमखास हॉतॅ. पयले उपचार माग वाटात्यात
- आयुर्वेदिक उपचाराॲ ॲलोपथी ऑखांदा घतीन साईड इफेक्ट्स हॉत नाय.
- आपल्या केंन्द्रात ९०% हार्ट ब्लॉकेज, पॅरॉलिसिस, बॅक पेन (पाट दुखी), हांदे दुखी, मुळव्याध थायरॉईड सायटिका अहलॅलॅ अहॅ कॉडॅतरी पेशंट गॅल्या वहराभरात बरे जाल्यात.
- ज्येष्ठ नागरिक, समाजसेवी संस्था, गरजवंत याकरता २५% सवलत देत्याव.

**कयबी माइती विसारॅ हायदॅ तॅ आडॅ बेलाशक फोन करा.**
**९०४९५६७२४१ / ९१४६४८३४१९**

## हांबोडीतसॉ बर्नड लोपीस आन मॅरभाटसॉ तॉमास लोपीस ये दोगे अथर्व मेडिकल फाउंडेशनश्या तरफ्ये जकली व्यवस्था बगीत्यात

*इ जायरात नुसती वाश्याकरता दिली नाय, इ काळाइ गरज हाय भागून डॉख्यात ठवा.*

**२०१४ करता सुवर्णप्राशन डोसश्यो बय - बाबाइ लक्षात ठवा पुढश्यो तारकी :**

१७ जानेवारी , १३ फेब्रुवारी , १२ मार्च , ८ एप्रिल , ५ मे , १ जून , २८ जून , २५ जुलै , २१ ऑगस्ट , १७ सप्टेंबर , १४ ऑक्टोंबर , १० नोव्हेंबर , ०७ डिसेंबर

जकल्यांना नाताळश्या हनाश्यो ''टॉक्सीन फ्री'' शुभेच्छा!

समस्त कुपारी बांधवांस नाताळ अन् नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!

# स्वाभिमानी वसईकर संघटना

जगवा रे, पेटवा रे, चेतवा स्वाभिमानी हा...

**मागील ४ वर्षांच्या वाटचालीतील ठळक उपक्रमः**

१) महापालिकाविरोधी आंदोलनात अग्रेसर

२) वसईतील राजकीय परिवर्तनात सिंहाचा वाटा

३) नागरी समस्या सोडविण्यासाठी विशेष प्रयत्न

४) गरीब व गरजू विद्यार्थ्यांना व रूग्णांना आर्थिक मदत

५) अनेक ठिकाणी रक्तदान शिबीरे

६) समाजातील रूग्णांना वेळोवेळी रक्तासाठी मदत

७) पासपोर्ट कँप तसेच आगाशी पोलिस स्टेशन येथे पासपोर्ट चौकशी विभागासाठी विशेष प्रयत्न

८) बॅन्ड्रा फेअर भाविकांसाठी दरवर्षी माफक दरात नाटकाची सोय

९) तहसीलदार, पोलिस व वीज वितरण मंडळ अधिकाऱ्यांशी वेळोवेळी भेटी व सुसंवाद

१०) 'स्वाभिमानी वसईकर' ह्या त्रैमासिकाद्वारे जनजागृती

११) कॅथोलिक बँक (वार्षिक सभा) मध्ये अभ्यासू सहभाग व व्यवस्थापनाशी वेळोवेळी पत्रव्यवहार

१२) वृक्षारोपण तसेच पर्यावरण अनूकुल पिशव्यांचे वाटप

१३) गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

१४) स्पॅनिश फुटबॉल टीमकडून शाळकरी विद्यार्थ्यांना फुटबॉल मार्गदर्शन

१५) अनेक ठिकाणी आधार कार्डसाठी शिबीरे